अहवाल क्रमांक : १६७

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

**(२०१७-२०१८)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**अकोला जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

## एकविसावा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१८

# पंचायती राज समिती

**(२०१७-२०१८)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**अकोला जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# एकविसावा अहवाल

# पंचायती राज समिति
## (सन २०१७-२०१८)

**समिति प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिति
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिति प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

*सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी पासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची "कार्यकारी समिती प्रमुख" म्हणून नामनियुक्ती केली आहे.

**सन्माननीय समिती प्रमुख, श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

१०. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री. अमित झनक, वि.स.स.

१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर अवर सचिव

(४) श्री. सचिन बाभळगांवकर , कक्ष अधिकारी

# प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा ' समिती प्रमुख ' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा एकविसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती साहजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला " Mini Legislature " सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बार्बीना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-०९ व सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-१६ साठी गठीत झालेल्या समितीने अकोला जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने अकोला जिल्हा परिषदेस दिनांक १, २ व ३ जून, २०१७ रोजी भेट देऊन डॉ.सुभाष पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २९ व ३० मे, २०१८ रोजी जिल्हा परिषद, अकोला संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ.प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.एकनाथ डवले, सचिव, ग्रामविकास विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्री.दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्री.किरण कुरुंदकर, सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्रीमती विनिता वेद सिंघल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.पी.वेलरासु, सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्री.र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.ना.भा.रिंगणे, उप सचिव (वित्त), ग्रामविकास विभाग, श्री.गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रि.श.कांबळे, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.सिध्दार्थ झाल्टे, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.संतोष गायकवाड, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ तसेच श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या अकोला जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २७ नोव्हेंबर २०१८.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | एक | तेल्हारा पंचायत समितीसाठी नविन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत | १ |
| (२) | दोन | इंदिरा आवास योजना, रमाई घरकुल योजना व शबरी घरकुल योजनेंतर्गत घरकुले अपूर्ण राहिल्याबाबत | ३ |
| (३) | तीन | शिर्ला ग्रामपंचायत वेगळी करण्याबाबत (पंचायत समिती, पातूर) | ८ |
| (४) | चार | शालेय व्यवस्थापन समितीची रचना, अस्तित्व व कार्याबाबत (पंचायत समिती, तेल्हारा) | ११ |
| (५) | पाच | एल.ई.डी खरेदी प्रकरणातील अनियमितता (पंचायत समिती, तेल्हारा) | १४ |
| (६) | सहा | लाभार्थ्यांना १०० म्हशींचे वाटप करुनही लाभ न मिळाल्याबाबत (पंचायत समिती, तेल्हारा) | १६ |
| (७) | सात | तेल्हारा पंचायत समितीच्या गोदामात सायकली वाटपाअभावी पडून असल्याबाबत | २० |
| (८) | आठ | गोरेगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची इमारत नादुरुस्त असून उपकेंद्रामध्ये औषधांचा अभाव असल्याबाबत | २४ |
| (९) | नऊ | शाळांना पुरवठा करण्यात येणाऱ्या धान्यादी मालाच्या वजनात फरक आढळून येत असल्याबाबत | २९ |
| (१०) | दहा | केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाबाबत | ३२ |
| | | **परिशिष्ट “ अ ” व “ ब ”** | ३५ |
| | | **शासनाचे आदेश व परिपत्रके आणि समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, अकोला (प्रशासन)

### तेल्हारा पंचायत समितीसाठी नविन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १ ते ३ जून, २०१७ या कालावधीत अकोला जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हयातील पदाधिकाऱ्यासमवेत चर्चा करीत असतांना सभापती, तेल्हारा पंचायत समिती यांनी तेल्हारा पंचायत समितीसाठी एका नवीन इमारतीची आवश्यकता आहे असा मुद्दा उपस्थित केला. जिल्हा परिषदेची इमारत, या व्यतिरिक्त जिल्हा परिषदेच्या ज्या त्रुटी व सुचना असतील त्यांचे निवेदन तयार करुन ते समितीला सादर करण्यात यावे. समितीद्वारे त्याबाबत विचारविनिमय करुन मंत्रालय स्तरावर शिफारस करण्यात येईल असे समितीने निदेश दिले. यासंदर्भात प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अकोला जिल्हा परिषदेसाठी नवीन इमारतीचा प्रस्ताव गेल्या दीड वर्षापूर्वी पाठविलेला आहे असे तेल्हारा पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी समितीस विदित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

समितीने अकोला जिल्हा परिषदेला भेट दिली असता अकोला जिल्ह्यातील विधीमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबीसंदर्भात:-

तेल्हारा पंचायत समितीसाठी नविन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत शासन स्तरावर कोणती उपाययोजना करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती, तेल्हाराची प्रशासकीय इमारत सद्य:स्थितीत वापरात आहे. सदर इमारतीच्या दुरूस्ती करीता सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात जि.प.सेस निधी मधून रु.१२.५० लक्षाची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच तेल्हारा पंचायत समितीची नविन प्रशासकीय इमारत होण्याबाबतची मागणी असल्याने जागेबद्दल शहानिशा करणे, इमारतीचे Structural Audit करणे करिता विहित प्रपत्र, घसारा किंमतीसह मालमत्ता नोंदवहीत नोंद, इमारतीचे फोटो, सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे, इत्यादीबाबत जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अकोट यांचे स्तरावरुन कार्यवाही चालू आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय : -** जिल्हा परिषद, अकोला यांच्या अभिप्रायाशी सहमत.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २९ मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, तेल्हारा पंचायत समितीसाठी नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत शासन स्तरावर कोणती उपाययोजना करण्यात आली आहे, यावर सचिव, मुख्यमंत्री, ग्रामसडक योजना विभाग यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेमार्फत अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरु आहे, ते शासनास प्राप्त होताच निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येईल. तेल्हारा येथे अगोदरची पंचायत समितीची इमारत आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जुनी इमारत कुचकामी झाली असून सदरहू प्रक्रियेस आपल्याकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. उपविभाग अकोट यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. इमारतीचे संरचनात्मक परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) झालेले नाही. इमारत पडल्यानंतर काम सुरु करणार आहेत काय, यावर सचिव, मुख्यमंत्री,

ग्रामसडक योजना यांनी विदित केले की, इमारतीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक मंजूर केले असून ते १२ लाख ५० हजार रुपयांचे आहे. सदरहू प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

तद्‌नंतर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी विदित केले की, सध्या इमारत वापरात असून दुरुस्तीचे काम केले आहे. आराखडा (ले-आऊट) करण्यासाठी उपमुख्य वास्तु विशारद यांच्याकडे पत्र व्यवहार करुन संपूर्ण आराखडा (ले-आऊटचा) सर्व्हे सुरु आहे, त्यासाठी संरचनात्मक परिक्षण अहवालाची आवश्यकता आहे. इमारत निर्लेखन करावयाची असल्यास स्ट्रक्चरल ऑडिट झाल्याशिवाय दुसरी इमारत बांधता येणार नाही, यानंतर सचिव, मुख्यमंत्री, ग्रामसडक योजना यांनी विदित केले की, जुनी इमारत पाडण्याची आवश्यकता नाही. कारण त्याची दुरुस्ती मोठया प्रमाणात केली असून तेथे कामकाज सुरु आहे. आताच्या इमारतीत जागा अपुरी होत असल्याने मोकळया जागेत नवीन इमारत बांधावयाची आहे, त्याबाबतचे अंदाजपत्रक त्वरित देण्याबाबत संबंधितांना सांगितले आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, नवीन इमारत बांधायची आहे, जुनी पाडायची आहे, तत्संदर्भात ठराव झाला आहे काय, जुनी इमारत पाडून नवीन बांधावी की, नवीनच बांधावी असा ठराव आहे काय, यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी माहिती दिली की, पंचायत समितीचा ठराव आहे की, नवीन इमारत बांधण्यात यावी. तद्‌नंतर कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनी खुलासा केला की, नवीन इमारत बांधावी असा ठराव झालेला आहे. इमारत चांगली असल्यास ठराव झाला तरी ती पाडता येत नाही. तसेच याबाबत जिल्हा परिषद स्तरावर चर्चा झालेली नसून पंचायत समिती स्तरावर चर्चा झाली आहे.

समितीने तद्‌नंतर असे मत व्यक्त केले की, प्रशासकीय मान्यता पाहिजे असल्यास पंचायत समितीकडून प्रस्ताव तयार करुन जिल्हा परिषदेकडे दिला जातो, त्यानंतर तो शासनाकडे येतो. जिल्हा परिषदेने अंदाज पत्रकात तरतूद केली नाही, जिल्हा परिषदेचे बजेट मंजूर झाले आहे. तद्‌नंतर कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, प्रमाणक शासन मंजूर करणार आहे. नंतर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांनी विदित केले की, हा विषय अनौपचारिक चर्चेच्या वेळी उपस्थित झाला आहे. हा विषय जिल्हा परिषदेच्या कोणत्याही समितीने मंजूर केलेला नाही. विभाग दोन महिन्यांत नवीन इमारतीचे अंदाजपत्रक तयार करीत आहे.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने अकोला जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेतील पदाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या अनौपचारिक चर्चेत पंचायत समिती, तेल्हारा करिता जागेअभावी नविन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली होती. त्यानुसार विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती, तेल्हारा ही इमारत जुनी व कुचकामी झालेली आहे. तेल्हारा पंचायत समितीच्या सध्याच्या इमारतीत जागा अपुरी आहे, त्यामुळे मोकळया जागेत नवीन इमारत बांधण्याची आवश्यकता असल्यामुळे तेल्हारा पंचायत समितीने नवीन इमारत बांधण्याबाबतचा ठराव संमत केलेला आहे. तथापि, यासंदर्भात जिल्हा परिषद स्तरावर चर्चा झालेली नाही. सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी १२ लाख ५० हजार रुपये एवढे अंदाजपत्रक मंजूर केलेले आहे. आतापर्यंत इमारतीची दुरुस्ती मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली असून त्याठिकाणी पंचायत समितीचे कामकाज सुरु आहे.

तथापि, **लोकप्रतिनिधींनी समितीकडे पंचायत समिती, तेल्हारा करीता एका नवीन प्रशासकीय इमारतीची आवश्यकता आहे असा मुद्दा उपस्थित केला, त्यामुळे लोकहितास्तव केलेली मागणी लक्षात घेऊन ती प्राधान्याने करण्यासाठी सध्या वापरात असलेल्या इमारतीचे निर्लेखन करण्यापूर्वी संरचनात्मक परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) अहवाल प्राप्त करुन उप मुख्य वास्तु विशारद यांचेकडून ले-आऊट सर्व्हे तयार करण्यात यावा व नवीन इमारतीचे अंदाजपत्रक तयार करुन जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकात तरतुद करण्याकरीता रितसर सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात याव्यात व इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे अशी समिती शिफारस करीत आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, अकोला (प्रशासन)

### इंदिरा आवास योजना, रमाई घरकुल योजना व शबरी घरकुल योजनेंतर्गत घरकुले अपूर्ण राहिल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ जून, २०१७ या कालावधीत प्रश्नावली क्र.२ बाबत अकोला जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, २२ घरकुले अपूर्ण, त्याच प्रमाणे १० घरकुले रद्द करण्याची कारणे काय आहेत, त्यावर कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, अकोला यांनी खुलासा केला की, जागेअभावी १० घरकुले रद्द करण्यात आली आहेत. २२ घरकुलधारकांनी शौचालये बांधली नसल्यामुळे ती अपूर्ण आहेत. पंडित दिनदयाळ योजनेतून जागा घेण्यासाठी ५० हजार रुपये देण्यात येतात. त्यांना या योजनेतून घरकुलासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी असे पत्र संबंधित ग्रामसेवकांना पाठविण्यात आले आहे, परंतु याबाबत ग्रामपंचायतींकडून अद्याप कार्यवाही झालेली नाही. ज्या ग्रामसेवकांनी सहकार्य केले नाही त्यांची नावे समितीला सादर करण्यात येतील. तसेच जे पत्र दिले त्या पत्राची प्रत समितीला देण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, गोरेगाव येथे पाच ते सहा घरकुले बांधण्यात आली असून तेथे शौचालये बांधण्यात आली नाहीत, असे असताना त्यांना निधी का उपलब्ध करुन देण्यात आला यावर कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, अकोला यांनी खुलासा केला की, शौचालयांची बांधकामे केल्याशिवाय तिसऱ्या हप्त्याचे पैसे देण्यात येणार नाहीत. तसेच अनेक ठिकाणी घरकुलांची कामे पूर्ण झाली असून तेथे शौचालये बांधण्यात आली नाहीत त्याबाबत त्या घरकुलधारकांना पहिला व दुसरा हप्ता देण्यात आलेला आहे, तिसरा हप्ता देण्यात आलेला नाही.

तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत घरकुले बांधली जात असताना शौचालये बांधल्याशिवाय तिसरा हप्ता देण्यात येत नव्हता. २२ घरकुलांची बांधकामे पूर्ण असून तेथे शौचालये बांधण्यात आली नसल्यामुळे ती अपूर्ण आहेत. शौचालये नसली तरी घरे वापरण्यात येत आहेत. त्याठिकाणी शोषखड्डा किंवा सेप्टीक टाकी करुन शौचालये करण्यात येत आहेत, त्यानंतर त्यांना तिसरा हप्ता देण्यात येतो तसेच स्वच्छ भारत मिशन संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत असून माहे मार्च, २०१८ पर्यंत संपूर्ण जिल्हा हागणदारी मुक्त करावयाचा आहे. ६८ टक्के ग्रामस्थांकडे शौचालये असून ३२ टक्के ग्रामस्थांकडे शौचालये नाहीत. ६४ हजार शौचालये बांधल्यानंतर जिल्हा हागणदारी मुक्त होईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, यासाठी काही विशेष योजना राबविण्यात येत आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की,या कामासाठी जिल्हा स्तरावर एक वेगळा कक्ष स्थापन करण्यात येत असून गावागावात प्रबोधन करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन काही योजना राबविण्यात येत आहेत. जे ग्रामस्थ शौचालये बांधणार नाहीत त्यांना लाभ देण्यात येणार नाही. त्यानुसार त्यांना रेशनकार्डवर धान्य व वीज मिळणार नाही. यासंदर्भातील काही निर्णय जिल्हा नियोजन बैठकीत घेणे आवश्यक आहे. या कामासाठी लोकप्रतिनिधींचा व लाभार्थ्यांचा सहभाग आवश्यक आहे. तद्नंतर समितीने सदरहू विषय महत्वपूर्ण असल्याने समितीने हा विषय विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी घेण्यात यावा असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) घरकुले अपूर्ण असल्याबाबत (पंचायत समिती, अकोला) शौचालयांचे बांधकामाअभावी अपूर्ण असलेल्या २२ घरकुलांची कामे सद्य:स्थितीत पूर्ण झाली आहेत काय ? अकोला जिल्हामध्ये शौचालयांची सद्य:स्थिती काय आहे ?

(२) जिल्हयातील ग्रामीण भागातील कुडाच्या व मातीच्या घरात राहणाऱ्या गरिबांसाठी घरकुले बांधण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, बेघरांना व कच्चे घर धारकांना घरकुल बांधुन देण्याबाबत ग्रामसभेने किती ठराव पारित केले आहेत, सध्या जिल्हयात किती घरकुलांची मागणी आहे व ती केंव्हा पुर्ण करण्यात येणार आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सदर अपूर्ण असलेल्या २२ घरकुलांच्या लाभार्थ्यांना पहिला व दुसरा हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे. परंतु अंतिम हप्ता वितरित करण्यापूर्वी तपासणी केली असता एकूण २२ घरकुलांच्या शौचालयांचे बांधकाम व काही किरकोळ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले नसल्याचे आढळून आले. तथापि, सदर ठिकाणी पंचायती राज समितीच्या भेटीनंतर गट विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता लाभार्थ्यांनी स्वखर्चाने शौचालयाचे काम पूर्ण केले असल्याचे आढळून येत आहे. पंचायत समिती, अकोला यांनी दिनांक ३१ जानेवारी,२०१८ रोजी जिल्हा हागणदारी मुक्त असल्याचे म्हटले आहे.

(२) (१) जिल्हयातील ग्रामीण भागातील कुडाच्या व मातीच्या घरात राहणाऱ्या गरिबांसाठी घरकुले बांधण्यासंदर्भात शासनाने सन २०१६-१७ पासुन इंदिरा आवास योजनेचे रुपांतर प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये केले आहे. तसेच राज्य पुरस्कृत रमाई घरकुल योजना अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांकरीता राबवीत आहे. शबरी घरकुल योजना अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी राबवित आहे. त्याकरीता जिल्हयातील एकुण ५२९ ग्रामपंचायतींपैकी ५२८ ग्रामपंचायतींचे ग्रामसभेचे ठराव पारित झालेले आहेत.

(२) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत जिल्हयामध्ये ४६,२५० लाभार्थी पात्र असुन त्यापैकी अद्यापपर्यंत जिल्हयाला १६,५४९ घरकुलांचे उदिष्ट देण्यात आले होते, त्यापैकी १५,७२१ घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे व त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित ३०,७९९ घरकुलांना शासनाच्या निर्देशानुसार लाभ देण्यात येईल.

(३) रमाई घरकुल योजने अंतर्गत शासनाकडून जिल्हयामध्ये सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये एकूण ४,०९२ घरकुलांचे उदिष्ट देण्यात आले होते, त्यापैकी अद्यापपर्यंत सर्व ४,०९२ घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे व त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) शबरी घरकुल योजनेअंतर्गत जिल्हयामध्ये सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षासाठी एकुण ३०० घरकुलांचे उदिष्ट देण्यात आले होते, त्यापैकी अद्यापपर्यंत सर्व ३०० घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे व त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**(१) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे अभिप्राय-** जिल्हा परिषद, अकोला यांच्या अभिप्रायाशी सहमत.

(२) **ग्रामविकास विभागाचा अभिप्राय :**-सन २०१६-१७ पासून केंद्र शासनाने इंदिरा आवास योजनेचे स्वरुप बदलून प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) सुरु करण्याचा निर्णय घेतला. या योजनेच्या लाभार्थ्यांची निवड सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ च्या आधारे करण्यात येते.

**(१) प्रधानमंत्री आवास योजना ( ग्रामीण)** — अंतर्गत अकोला जिल्हयास सन २०१६-१७ सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या तीन वर्षात १८,३३६ इतके उदिष्ट देण्यात आले आहे. आवस सॉफ्ट वरील दि.२३ मे,२०१८ च्या अहवालानुसार १५,७२८ लाभार्थ्यांना मंजूरी देण्यात आली असून ३,९६७ लाभार्थ्यांची घरकुले पूर्ण झालेली आहेत व उर्वरित घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(**२) रमाई घरकुल योजनेंतर्गत** अकोला जिल्हयाकरिता सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षासाठी एकूण ४,०९२ घरकुलांना उदिष्ट देण्यात आले असून त्यापैकी सद्य:स्थितीत सर्व ४,०९२ घरकुलांना मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच ७०४ घरकुले पूर्ण झालेली आहेत व उर्वरित घरकुलांची कामे प्रगती पथावर आहेत.

(**३) शबरी घरकुल योजनेंतर्गत** अकोला जिल्हयाकरिता सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षासाठी एकूण ९०० घरकुलांचे उदिष्ट देण्यात आले असून त्यापैकी सद्यस्थितीत सर्व ९०० घरकुलांना मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच १०३ घरकुले पूर्ण झाली असून उर्वरित घरकुलांची कामे प्रगती पथावर आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३० मे, २०१८ रोजी घेतलेल्या साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी खुलासा केला की, प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत अकोला जिल्हयामध्ये ४६,५२० लाभार्थी पात्र असून त्यापैकी अद्यापपर्यंत जिल्हयाला १६,५४९ घरकुलांचे उदिष्ट देण्यात आले होते, त्यापैकी १५,७२१ घरकुलांना मंजूरी देण्यात आलेली आहे व त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित ३०,७९९ घरकुलांना शासनाच्या निर्देशानुसार लाभ देण्यात येईल. जिल्हयामध्ये मूळ ४६,५२० घरकुले पूर्ण करावयाची आहेत, त्याबाबत ३८,००० लाभार्थ्यांची नोंदणी करणे आवश्यक आहे. सर्व लाभार्थ्यांना घरकुल देण्यासाठी १२ लाखांचा जो मुद्दा आहे त्यासाठी नोंदणी प्रक्रियेची कार्यवाही सर्व ठिकाणी करीत आहेत. यामध्ये ३८,००० लाभार्थ्यांची नोंदणी झालेली आहे. उर्वरित १७,४०० घरकुलांच्या साईटस झिरो लाईन झाल्या आहेत आणि १५,७०० साईटस मंजूर झालेल्या आहेत. त्यांपैकी १७००० पैकी २३,०० घरकुले हे परत पुढे सुरु करता येतील. घरकुलांचे उदिष्ट साध्य करताना जसजसे ते पात्र होतील त्याप्रमाणे त्यांचा यादीमध्ये समावेश करण्यात येईल.

समितीने असे मत व्यक्त केले की, घरकुलांच्या प्रपत्र "ब" च्या यादीमध्ये ८,४५० अर्ज आहेत. त्यापैकी पहिल्या वर्षी १,६०० आणि दुसऱ्या वर्षी १,७०० घरकुले मंजूर झाली आहेत. आता ही प्रपत्र "ब" ची यादी कधी संपणार आहे आणि प्रपत्र "ड" च्या यादी मधील लाभार्थी प्रतिक्षा यादीत आहेत. विभागाने शासनाकडे निधी मागितला असता तर शासनाने निधी मंजूर करुन घरकुले पूर्ण झाली असती. एका पंचायत समितीचे उदाहरण घेतले तर ८,५०० अर्ज आहेत, त्यामध्ये १,६०० ते १,७०० असे दोन वेळेस मंजूर केलेले आहेत आणि प्रपत्र "ब" च्या यादी मध्ये ५,००० अर्ज प्रलंबित आहेत. प्रपत्र "ब" ची यादी पूर्ण झालेली आहे आणि वाचन सुरू आहे. त्यावर सचिव (अतिरिक्त कार्यभार), ग्राम विकास विभाग यांनी खुलासा केला की, विविध बैठकांच्या माध्यमातून १२ लाख अर्जाची जी प्रपत्र "अ" ची यादी दिलेली आहे, ती पूर्ण करण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिलेले आहेत. प्रपत्र "ड" ची यादी ही खूप मोठी असेल अशी माहिती समितीस अवगत करण्यात आली. ग्राम विकास विभाग यांनी प्रपत्र "अ" च्या यादीतील १२ लाख घरकुले पूर्ण करण्याचे उदिष्ट आहे. तसेच प्रपत्र "अ" ची घरकुले पूर्ण करण्यासाठी १२ लाख घरकुले आपल्याला पूर्ण करायची आहेत. त्याच्या माहितीसाठी वेगवेगळया बैठका घेण्यात येत आहेत अशी समितीस माहिती दिली. प्रपत्र अ, ब आणि ड ही यादी ग्रामीण भागासाठी आहे. शहरी भागासाठी आपण प्रधानमंत्री आवास योजना काढलेली आहे, एसीसीचा सर्व्हे केला त्यामध्ये असे अपेक्षित होते की, ही योजना पहिल्यांदा फक्त घरकुलांसाठी लागू होती, त्यामुळे ज्यांच्याकडे पक्की घरे आहेत, त्यांचे खाजगीकरण झालेले आहे. काहींची घरकुले पक्की आहेत, त्यामुळे तिथे वाद निर्माण झाला आहे. तद्नंतर समितीने निदेश दिले की, अकोला जिल्हयाची जेवढी घरकुले अपूर्ण आहेत ती लवकरात लवकर म्हणजे माहे जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.

घरकुले अपूर्ण असल्याबाबत शौचालयांच्या बांधकामाअभावी अपूर्ण असलेल्या २२ घरकुलांची कामे सद्य:स्थितीत पूर्ण झाली आहेत काय व अकोला जिल्ह्यामध्ये शौचालयांची सद्य:स्थिती काय आहे, यावर सचिव, ग्रामविकास

(अतिरिक्त कार्यभार) विभाग यांनी खुलासा केला की, पंचायत समिती, अकोला येथे २२ घरकुले होती. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्ह्यामध्ये बऱ्याच ठिकाणी मोठया प्रमाणावर अपूर्ण अवस्थेत घरकुले आहेत.

तद्नंतर पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत जिल्ह्या जिल्ह्यात किती घरकुलांची मागणी आलेली आहे. यावर्षी सन २०१७ मध्ये किती साध्य केली जाणार आहेत. प्रत्यक्षात लाभार्थ्यांची भेट घेऊन त्यांना लाभ मिळाला आहे किंवा कसे यामध्ये ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक आणि सरपंच यांच्यामार्फत लाभार्थ्यांची निवड केली जाते. यावर जिल्हा परिषदेचा अंकुश असतो किंवा कसे ? याबाबत समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सामाजिक आर्थिक सर्व्हेक्षणास सन २०११ मध्ये सुरुवात केली होती, परंतु प्रत्यक्षात त्याची सुरुवात सन २०१२ मध्ये झाली होती. केंद्र शासनातील अंगिकृत असलेल्या कंपनीद्वारे सन २०१३-१४ मध्ये बाह्य स्त्रोताद्वारे सर्व्हे केला होता. यानंतर मागील वर्षी ग्रामपंचायत स्तरावर एक यादी प्रसिध्द करण्यात आली होती. या निकषामध्ये १३ मुद्दे निश्चित केले होते. केंद्र सरकारच्या अंगिकृत असलेल्या कंपनीने सर्व्हे करुन त्याबाबतची माहिती टॅबमध्ये अंतर्भूत केली होती. त्यानंतर ती एलआयसीच्या संकेत स्थळावर संकलित केल्यानंतर यादी प्रसिध्द केली. सदर यादीचे ग्रामसभेपुढे वाचन केले होते. त्यामुळे कोण पात्र आणि कोण अपात्र आहेत हे निश्चित करण्यासाठी मदत झाली. त्यानुसार ग्रामसभेने पात्र लाभार्थ्यांची यादी निश्चित केली. त्यानुसार संबंधित लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात आली होती. अपात्र लाभार्थ्यांना लाभ मिळाला नाही किंवा ज्यांची घरे कच्ची आहेत, अशा लाभार्थ्यांसाठी एक वेगळी सूचना देण्यात आली होती. अशा लाभार्थ्यांना गट विकास अधिकारी यांच्याकडे अपील सादर करण्यासाठी सूचना देण्यात आली होती. त्यानंतर घरांची पुर्नतपासणी करुन जर पात्र असेल तरच त्यांच्या नावाचा समावेश करुन त्याची यादी जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या समितीकडे पाठविण्याची आवश्यकता आहे. यानुसार समितीने गट विकास अधिकाऱ्यांना पत्र दिले होते. प्रत्यक्षात घरांची पडताळणी करुन पात्र लोकांबाबतचा अहवाल मागविण्यात आलेला आहे. जे पात्र लाभार्थी घरकुलांपासून वंचित आहेत, अशा लाभार्थ्यांचा समावेश करण्याबाबतची कार्यवाही माहे जून, २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. यामध्ये ज्या तक्रारी आलेल्या आहेत, त्याबाबत तपासणी करुन पुढील योग्य ती कार्यवाही केली जाते.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, सन २०१६-१७ च्या संदर्भात घरकुलांच्या उद्दिष्टामध्ये जो गोंधळ झालेला आहे त्या संदर्भात या संपूर्ण जिल्ह्यात ही घरकुले पूर्ण झाली पाहिजेत. कारण ती घरकुले जर अपूर्ण असतील तरी त्यांना वेळेत निधी वितरीत झाला पाहिजे. वेळेत निधी वितरीत करुन त्यांना काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र द्यावे. यासाठी आपल्या यंत्रणेने तात्काळ तपासणी करावी. त्यांच्या संदर्भात निधी देत असताना काही अधिकारी त्या लाभार्थ्याला लाभ मिळू नये म्हणून काही तरी व्याज ठेवतात. यातून अप्रत्यक्षरित्या वेगळा काही संदेश जातो तर अशा काही बाबी घडणार नाहीत याची दखल घ्यावी. २२ अपूर्ण घरकुले पावसाळ्याच्या आधी पूर्ण करण्यासाठी त्यांना निधी वितरीत झाला पाहिजे तसेच पंचायत समितीच्या वार्षिक सभा या प्रगती पथावर आहेत. ते काम झाले पाहिजे कारण तिथे माणसे नसल्यामुळे पहिला हप्ता दिल्यानंतर दुसरा हप्ता कोणी देत नाही. तो खूप गंभीर विषय आहे. शौचालय बांधकाम नसल्यामुळे ते काम अपूर्ण राहिलेले आहे आणि सन २०१२ च्या बेसलाईन सर्व्हेनुसार अकोला जिल्हा हा हागणदारी मुक्त झालेला आहे. शौचालये नसल्यामुळे घरकुले अपूर्ण राहिलेली आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, लाभार्थ्यांनी स्व:खर्चाने शौचालये पूर्ण केली आहेत. त्यांनी ते स्व:खर्चाने करण्याचे कारण काय आहे, तसेच घरकुलांच्या 'ब'च्या यादीमध्ये ८,४५० अर्ज आहेत. त्यापैकी पहिल्या वर्षी १,६०० आणि दुसऱ्या वर्षी १,७०० मंजूर झाली आहेत. 'ब' ची यादी कधी संपणार आहे आणि 'ड' च्या यादीमधील ग्रामस्थ प्रतिक्षा यादीत आहेत, विभागाने शासनाकडे जर निधीची मागणी केली असती ते मंजूर केले असते आणि त्यामध्ये घरकुले पूर्ण झाली असती. एका पंचायत समितीचे उदाहरण घेतले तर ८,५०० अर्ज आहेत, त्यामध्ये १,६०० ते १,७०० दोन वेळेस मंजूर केलेले आहेत आणि 'ब' च्या यादीमध्ये ५,००० अर्ज प्रलंबित आहेत. आता 'ब' ची यादी पूर्ण झालेली आहे.

याबाबत प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, विविध बैठकांच्या माध्यमातून १२ लाख अर्जांची जी 'अ' ची यादी दिलेली आहे ती पूर्ण करण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिलेले आहेत व 'ड' ची यादी ही खूप मोठी असेल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, 'ब'ची यादी ३० टक्के आहे पण 'अ' ची यादी पूर्ण करण्याबाबतचा पहिला विषय आहे. ती पूर्ण करण्यासाठी शासनास शिफारस करण्यात आलेली आहे. 'अ' ची घरकुले कधीपर्यंत पूर्ण होतील आणि प्रपत्र 'अ' च्या यादीसाठी पूर्ण पैसे देण्यात येत आहेत. तर ते पूर्ण करण्याबाबत कोणते उद्दिष्ट आहे, याबाबत सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सांगितले की, प्रपत्र 'अ'च्या यादीतील १२ लाख घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, अकोला जिल्ह्याची जेवढी घरकुले अपूर्ण राहिली आहेत ती माहे जून महिन्यात पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद अकोला येथे भेट देऊन सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कुडाच्या व मातीच्या घरात राहणाऱ्या गरीबांसाठी घरकुले बांधण्यासाठी शासनाने सन २०१६-१७ या वर्षापासून इंदिरा आवास योजनेचे रुपांतर प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये केले आहे. राज्य पुरस्कृत रमाई घरकुल योजना अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी तसेच शबरी घरकुल योजना अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी राबविली जात आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांची निवड सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ च्या आधारे करण्यात येते.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अकोला जिल्ह्यामध्ये ४६,५२० लाभार्थी पात्र असून अद्यापपर्यंत जिल्ह्याला १६,५४९ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी १५,७२१ घरकुलांना मंजूरी देण्यात आलेली आहे व त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ३०,७९९ घरकुलांना शासनाच्या निर्देशानुसार लाभ देण्यात येईल. यामध्ये ३८,००० लाभार्थ्यांची नोंदणी झालेली आहे. तथापि, समितीकडे घरकुलांसंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामध्ये घरकुलांकरीता वेळेत निधी वितरीत होऊ न शकल्याने घरकुले अपूर्णावस्थेत आहेत. पहिला हप्ता प्राप्त झाल्यावर दुसरा हप्ता वेळेवर मिळत नाही. सन २०१२ च्या आधार रेषेच्या (बेसलाईन) सर्वेक्षणानुसार अकोला जिल्हा हागणदारीमुक्त झालेला आहे. तरी देखील शौचालये नसल्यामुळे घरकुले अपूर्ण अवस्थेत आहेत, याबद्दल समिती सखेद आश्चर्य व्यक्त करीत आहे.

**घरकुलांच्या प्रपत्र "ब" च्या यादीमध्ये ८४५० अर्ज आहेत. त्यापैकी पहिल्या वर्षी १६०० अर्ज आणि दुसऱ्या वर्षी १७०० अर्ज असे दोनवेळा अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. अद्याप ५००० अर्ज प्रलंबित आहेत. तसेच "अ" प्रपत्रातील १२ लाख घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे, तसेच प्रपत्र "ड" यादीसाठी लाभार्थी प्रतिक्षाधिन आहेत. संबंधित विभाग शासनाकडे घरकुलांसाठी निधीची पुरेशी मागणी करीत नसल्याने घरकुले पूर्ण होण्यासाठी विलंब होत आहे. अ, ब आणि ड ही यादी ग्रामीण भागासाठी आहे. तर शहरी भागासाठी प्रधानमंत्री आवास योजना आहे. अकोला जिल्ह्यासाठी ठरविण्यात आलेले घरकुलांचे उद्दिष्ट लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे तसेच जी घरकुले अपूर्ण आहेत किंवा बांधून पूर्ण झाली आहेत वा ज्यांना अजून घरकुलाचे काम पूर्ण होऊनही अद्यापपर्यंत निधी मिळाला नाही अशा सर्व घरकुलांची माहिती एकत्रित करावी व अशा सर्व अपूर्ण व पूर्ण झालेल्या घरकुलांचा निधी संबधित लाभार्थ्यांना तातडीने देण्यात यावा व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा स्वयंस्पष्ट विवेचनात्मक अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, अकोला (प्रशासन)

## शिर्ला ग्रामपंचायत वेगळी करण्याबाबत (पंचायत समिती, पातूर)

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ जून, २०१७ या कालावधीत अकोला जिल्हा परिषदेस भेट दिली. सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीने शिर्ला ग्रामपंचायत कार्यालयास भेट दिली असता समितीच्या निदर्शनास खालील मुद्दे आणून देण्यात आले.

(१) शिर्ला ग्रामपंचायतीने नगरपरिषद होण्यासाठी मागणी केलेली आहे.

(२) शिर्ला ग्रामपंचायत वेगळी असावी, याबाबत समितीने विधान भवन, मुंबई येथे सचिवांची साक्ष घेईल असे ग्रामपंचायातीला आश्वासन दिले.

(३) शिर्ला ग्रामपंचायतीच्या हद्द वाढीसाठी समितीने शासनाकडे शिफारस करावी.

(४) शिर्ला ग्रामपंचायतीने पाणी फाऊंडेशनच्या कामाबाबत समितीस माहिती दिली.

(५) ग्राम पंचायतीने लाभार्थ्यांची नावे कार्यालयाच्या भिंतीवर लिहिल्याने समितीने समाधान व्यक्त केले.

(६) शिर्ला ग्रामपंचायत १०१ शौचालये बांधणार असल्याचे समितीस आश्वस्त केले.

(७) शिर्ला ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये १७ बंधारे बांधल्यामुळे १५८ हेक्टर जमीन ओलिताखाली आली अशी माहिती समितीला दिली.

(८) शिर्ला ग्रामपंचायतीने त्यांच्या परिसरात आंब्याची अनेक झाडे लावल्याबाबतची माहिती दिली.

(९) शिर्ला ग्रामपंचायतीने ग्रामसचिवालय इमारत बांधण्याबाबत समितीकडे मागणी केली.

(१०) जल शुध्दीकरण यंत्र (आर.ओ.) मंजूर झालेले असून त्याबाबत पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामपंचायत कार्यालय, शिर्ला, तालुका पातूर :- शिर्ला ग्रामपंचायत वेगळी करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

अकोला जिल्हयामधील पातुर, पंचायत समिती अंतर्गत शिर्ला ग्रामपंचायत वेगळी करण्याबाबत दि.१३-०१-२०१५ रोजी शिर्ला येथील एकुण ६१ रहिवाश्यांचे अकोला जिल्हयाचे पालकमंत्री महोदय, मा.डॉ.श्री.रणजीतजी पाटील यांना निवेदन सादर केले होते. सदर निवेदनानुसार शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-२६०३/प्र.क्र.१५४४/पंरा-४ दि.१२ फेब्रुवारी, २००४ **(परिशिष्ट क्र. ३.१)** अन्वये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापनेकरीता निकषात बसत असल्यास पडताळणी करुन प्रस्ताव सादर करणेबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पातुर यांना कळविण्यात आले.

उक्त प्रकरणी सदर ग्रामपंचायतीची माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निवडणूक असल्यामुळे व त्यापुर्वी निवडणुक प्रक्रिया सुरु होणार असल्याने, शासन निर्णयामधील निकषाप्रमाणे ग्रामपंचायती निवडणुक प्रक्रिया सुरु झाल्यावर प्रस्ताव सादर करु नये अशा सुचना असल्याने, ग्रामपंचायत विभाजनाचा प्रस्ताव शासनास पाठविणे उचित होणार नाही. सदरहू प्रस्ताव निकषाप्रमाणे सादर करण्यात येईल असे सरपंच / सचिव यांनी दि. २३-०३-२०१५ चे पत्राने गट विकास

अधिकारी, पंचायत समिती, पातुर यांचेमार्फत या कार्यालयास कळविलेले आहे. तद्नंतर आजतागायत ग्रामपंचायत, शिर्ला यांचेकडून ग्रामपंचायत विभाजनाबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे प्राप्त झालेला नाही.

वरील शासन निर्णयामधील "च" नुसार ग्रामपंचायत निवडणूक होऊन ग्रामपंचायत अस्तित्वात आल्यापासून दोन वर्षाच्या कालावधी पर्यंत ग्रामपंचायतीचे विभाजन/ एकत्रीकरण करु नये तसेच याच शासन निर्णयामधील "ड" नुसार जि.प. ने. स्वत:हून स्वतंत्र ग्रामपंचायतीचे प्रस्ताव सादर करु नये अशा सुचना असल्यामुळे शिर्ला ग्रामपंचायत वेगळी करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे अभिप्राय : —**

जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत. शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३० मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी शिर्ला ग्रामपंचायत वेगळी करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे तसेच हा काही फक्त शिर्ला ग्रामपंचायतीचा विषय नसून संपूर्ण राज्याचा आहे. कारण बऱ्याच ठिकाणी १५ ते २० किलोमिटरच्या रस्त्यावर ग्रामपंचायत नाही. अशा गावांमध्ये शासन स्तरावर ४ ते ५ गावांची एक गट ग्रामपंचायत असते. यासाठी शासन स्तरावर असा निर्णय करायचा आहे की, ३ ते ४ किलोमिटरच्या ग्रामस्थांना त्या ग्रामपंचायतीमध्ये अनिवार्यपणे समाविष्ट करुन घ्यावेच लागेल. प्रत्येक प्रभागामध्ये वेगवेगळया अडचणी येतात म्हणून ग्रामपंचायतीचे विलिनीकरण किंवा विभाजन करायचे असेल तर आपल्याला शासन स्तरावर तसा काहीतरी ठोस निर्णय घ्यावा असे समितीने निदेश दिले. त्यावर, सचिव, ग्रामविकास (अतिरिक्त कार्यभार) विभाग यांनी विदित केले की, विभागाने लोकसंख्येच्या प्रमाणात निधी खर्च करावा असे सांगण्यात आले आहे.

तदनंतर समितीने एक गट ग्रामपंचायत ही ५ गावांची आहे. ग्रामसेवकांशी काम असेल तर त्यांना विचारल्यावर ते सांगतात की, मी या गावात आहे पुन्हा विचारल्यानंतर सांगतात की, मी दुसऱ्या गावात आहे अशा प्रकारे तो त्या ५ गावांमध्येही नसतो. परिणामी, २५ ते ३० किलोमीटर दूर असलेल्या ग्रामस्थांना अडचणी निर्माण होतात. ग्रामीण व दुर्गम भागातील ग्रामस्थांना अनेक समस्या उद्‌भवत आहेत असे समितीने निदर्शनास आणून दिले. तसेच शासन स्तरावरुन काही गावांतील छोटया-छोटया ग्रामपंचायती निर्माण कराव्यात त्यामध्ये ग्रामसभेचा ठराव किंवा त्या गावाची सहमती घ्यावी. कोणत्याही त्रुटी न ठेवता आपण शासन स्तरावर निर्णय घेतल्यास ते योग्य होईल. कारण गावात गटग्रामपंचायत असेल तर तेथील ग्रामस्थ त्याचा स्विकार करीत नाही. उक्त विषयावर सर्वकष निर्णय होणे आवश्यक असल्याने त्या बाबींची पुर्तता होण्यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे असे समितीने निदेशित केले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, अकोलाच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालासंदर्भात पातूर पंचायत समिती अंतर्गत शिर्ला ग्रामपंचायतीला समितीने भेट दिली असता शिर्ला ग्रामपंचायतीने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, शिर्ला ग्रामपंचायत वेगळी करण्यासंबंधात दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी शिर्ला येथील एकूण ६१ रहिवाश्यांनी पालक मंत्री, अकोला जिल्हा यांना निवेदन सादर केले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयानुसार स्वतंत्र ग्रामपंचायत

स्थापनेकरिता निकषात बसत असल्यास पडताळणी करून तसा प्रस्ताव सादर करण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पातूर यांना कळविण्यात आले होते. परंतू सदर ग्रामपंचायतीची माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निवडणुक असल्यामुळे निकषाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर ग्रामपंचायत विभाजनाचा प्रस्ताव शासनास पाठविणे उचित होणार नाही असे दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीस कळविले होते. तथापि, शासन निर्णयामधील मुद्दा क्रमांक "च" आणि "ड" नुसार ग्रामपंचायत अस्तित्वात आल्यापासून दोन वर्षाच्या कालावधीपर्यंत ग्रामपंचायतीचे विभाजन अथवा एकत्रीकरण करु नये आणि जिल्हा परिषदेने स्वत:हून स्वतंत्र ग्रामपंचायतीचे प्रस्ताव सादर करु नये असे नमूद करण्यात आलेले आहे.

**बऱ्याच ठिकाणी १५ ते २० किलोमीटरच्या रस्त्यावर ग्रामपंचायत नसल्यामुळे अशा गावांमध्ये शासन स्तरावर ४ ते ५ गावांची एक गट ग्रामपंचायत असते. प्रत्येक गावामध्ये प्रत्येक प्रभागामध्ये वेगवेगळया अडचणी येतात. त्यामुळे विकासात्मक विधायक कामे करताना २० ते २५ किलोमीटर दूर असलेल्या ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्याकरीता ग्रामसभेचा ठराव किंवा त्या गावाची सहमती घ्यावी. कोणतीही सक्ती न ठेवता शासन स्तरावर निर्णय घेण्यात यावा व ग्रामपंचायतीच्या कामकाजामध्ये सुसूत्रता येण्यासाठी शासन स्तरावरुन काही छोट्या छोट्या गावांसाठी स्वतंत्ररित्या ग्रामपंचायती निर्माण कराव्यात अशी समितीची शिफारस आहे व प्रस्तुत प्रकरणी ग्रामविकास विभागाने कार्यवाहीचा स्वयंस्पष्ट अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावा.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, अकोला (प्रशासन)

## शालेय व्यवस्थापन समितीची रचना, अस्तित्व व कार्याबाबत (पंचायत समिती, तेल्हारा)

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ जून, २०१७ या कालावधीत अकोला जिल्हा परिषदेअंतर्गत तेल्हारा पंचायत समिती येथे समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, जिल्ह्यात पंचायत समिती निहाय किती ग्राम पंचायती मध्ये शाळा व्यवस्थापन समित्या गठित करण्यात आल्या आहेत? सदरहू ग्राम शिक्षण समित्यांच्या बैठकी नियमित घेण्याबाबत शासनाचे आदेश काय आहेत त्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तेल्हारा यांनी खुलासा केला की, तेल्हारा तालुक्यातील १०४ जिल्हा परिषद शाळेत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये शाळा व्यवस्थापन समित्या गठित करण्यात आल्या असून शाळा व्यवस्थापन समितीच्या दरमहा बैठका घेण्यात येतात. तसेच दिनांक १७ जून, २०१० च्या शासन निर्णयातील प्रस्तावनेमधील मुद्दा क्रमांक ३ नुसार ग्राम शिक्षण समितीच्या रचना व कार्यामध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे नमूद केले आहे, त्यानुसार शासन स्तरावरुन ग्राम शिक्षण समितीच्या बैठकीबाबत कोणतेही आदेश प्राप्त नाहीत. सदरहू उत्तराने समितीचे समाधान न झाल्याने त्याबाबत पूर्वीचे धोरण काय होते व शालेय व्यवस्थापन समितीची रचना, अस्तित्व व त्यांची कामे काय आहेत, यासंदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळेस सदरचा विषय चर्चेला घेण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, तेल्हारा शालेय व्यवस्थापन समितीची रचना, तिचे अस्तित्व, त्यांची कामे काय आहेत, तसेच दिनांक १७ जून, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर कार्यामध्ये बदल करण्यात आला आहे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.** शालेय व्यवस्थापन समितीची रचना, तिचे अस्तित्व व कामे याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** शासन अधिसूचना, दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ अन्वये बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार हक्क नियम, २०११ विहित केले आहेत. त्यातील नियम १३ मध्ये शाळा व्यवस्थापन समितीची रचना व कार्ये विहित केली आहेत. सदर समिती गठीत करणे, समितीचे सदस्य, समितीची कार्ये याबाबत या नियमात स्पष्ट तरतूदी आहेत. त्यामध्ये बदल करण्यात आलेला नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेअंतर्गत तेल्हारा पंचायत समितीला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३० मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती तेल्हारा, शालेय व्यवस्थापन समितीची रचना, तिचे अस्तित्व, त्यांची कामे काय आहेत, तसेच दिनांक १७ जून, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार

सदर कार्यालयामध्ये बदल करण्यात आला आहे काय तसेच नियमात स्पष्ट तरतूद असल्याचे सांगितले आहे, याबाबत खुलासा करण्यात यावा, यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, नियमात तरतुदी आहेत. त्यामुळे कोणताही बदल करण्यात आलेला नाही. ते तसेच आहेत बदल करण्याची आवश्यकता नाही. राज्यात एका ठिकाणी होत असलेली चांगली बाब दुसऱ्या ठिकाणी होणे गरजेचे असल्याने त्यासंदर्भात परिपत्रक काढण्यात येते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, शालेय व्यवस्थापन समितीला नियम माहित नाहीत काय, इतक्या वर्षाच्या काळात अजूनही शाळा व्यवस्थापन समितीला त्यांचे अधिकार माहित नाहीत. अधिकाऱ्यांना यांची जाणीव नसणे, शालेय व्यवस्थापन समितीमध्ये वाचन झाले पाहिजे. सदर बाबतीत जबाबदारी निश्चित करण्यात यावी. केंद्र प्रमुखांच्या माध्यमातून वाचन झाले पाहिजे, पण त्यांनाच त्यांची कार्ये माहित नाहीत. यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी विदित केले की, तत्संदर्भात प्रशिक्षण दिले जाते. शालेय शिक्षण विभाग सतत सुधारणा करीत आहे. प्रशिक्षण दिले जाते, मात्र कंटाळवाण्या प्रशिक्षणाला रस राहत नाही. सतत यावर चर्चा करण्यात येते. संस्थेच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्याकरिता येतात म्हणून पैसे देण्यात येतात. येथपर्यंत काळजी घेतली जाते. याच वर्षात माहे जानेवारी, २०१८ या महिन्यात सर्व तालुक्यांत मोठया प्रमाणात शाळा व्यवस्थापन समितीचे सभासद स्वत: आले होते, वेगवेगळया शाळांत काय घडते याचे प्रदर्शन केले होते, ते त्यांनी पाहिले आणि स्वत: सांगितले की, ते यामध्ये लक्ष देणार आहेत. वाशिम जिल्हयास भेट दिली त्यावेळेस कारंजा तालुक्यातही प्रदर्शन भरविले होते. २ महिन्यांपूर्वी वाडा तालुक्यात जाऊन बैठक घेतली. प्रत्येक तालुक्यात दोन ते अडीच हजार सदस्य आहेत. मागच्या वर्षी आम्ही दोन पातळयांवर प्रशिक्षण दिले. केंद्र पातळीवर प्रशिक्षण दिले आणि तालुका पातळीवर मेळावे भरविले. मागच्या वर्षी ते खूप यशस्वी झाले आहे. सर्व गोष्टींच्या अनुभवावरुन एक परिपत्रक काढले, जेणेकरुन वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या भागातील लोकांना समजावे.

समितीने पुढे विचारणा केली की, आपण कार्यक्रमांना सदस्य आले असे सांगितले आहे. काही ठिकाणी मेळावे झाले असतील, मात्र राज्यात तशी स्थिती नाही. याबाबत प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी असे विदित केले की, काही ठिकाणी झाले नसतील तर काही ठिकाणी झाले आहेत. समितीने पुढे विचारणा केली की, शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना भत्ता देण्यात येत नाही, ग्रामीण भागातून शहरी भागात येताना खर्च होतो, त्यामुळे त्यांच्यामध्ये जागरुकता राहिलेली नाही. प्रवास भत्ता का देत नाही असे समितीने मत प्रकट केले असता त्यावर प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, १० वर्षांपूर्वी हाच मुद्दा होता. मागच्या वर्षी ते स्वत: पैसे खर्चून आले, त्यांना शासनाकडून २५ हजार रुपये देण्यात येतात असे सांगितले. बदल झाला आहे. सन २०१५ मध्ये शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव पदावर विद्यमान प्रधान सचिव आल्यापासून यामध्ये फरक आहे. मेळावे तालुका पातळीवर झाले आहेत. अकोला जिल्ह्याबाबतही सांगण्यात येईल. अमरावती व नागपूर येथे मेळावे झाले आहेत. मूर्तिजापूर तालुका सर्वात पुढे आहे. काही तालुक्यांची अडचण आहे, ती शालेय शिक्षण विभाग हळुहळू सोडवत आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, ब्रिटिश कौन्सिलच्या कोर्सच्या संदर्भात काय सुरु आहे ? त्यासंदर्भात, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस पुढील प्रमाणे विदित केले की, ब्रिटिश कौन्सिलचे प्रशिक्षण ६ वर्षांपासून सुरु आहे. प्राथमिक पातळीवर प्रशिक्षण करून करार केला होता. प्राथमिक नंतर ते लोक हताश झाले होते. प्राथमिकचे प्रशिक्षण बंद झाले होते, पण माध्यमिकचे सुरु होते. मी सांगितले की, प्राथमिक मध्येही मुले शिकली पाहिजेत. मग त्यांनी तेजस नावाचा एक कार्यक्रम टाटा ट्रस्टच्या माध्यमातून सुरु केला. आम्ही ९ जिल्ह्यांत एक वर्ष त्यांचा कार्यक्रम घेतला आहे आणि यावर्षी संपूर्ण ३६ जिल्ह्यांत करीत असून त्याची व्याप्ती वाढत आहे. एकूण ५ कार्यक्रम आहेत. आम्ही शिक्षकांना पसंती देत आहोत की, तुम्ही ब्रिटिश कौन्सिलचा तेजस नावाचा कार्यक्रम घेऊ शकता किंवा पाठयपुस्तावर आधारित अस्तित्व नावाचा कार्यक्रम घेऊ शकता. डेटा कंपनी ई-लर्निंगचे किट बनविणारी कंपनी आहे, त्यांच्याकडून सीएसआरच्या माध्यमातून हे काम केले असून अतिशय चांगले आहे. सदरहू कार्यक्रम आई-वडील व मुले एकत्र शिकू शकतात अशी माहिती समितीस दिली.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १ ते ३ जून, २०१७ या कालावधीत जिल्हा परिषद, अकोला येथे भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान तेल्हारा पंचायत समितीच्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, अकोला जिल्हयातील १०४ जिल्हा परिषद शाळेत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये शाळा व्यवस्थापन समिती गठित करण्यात आल्या आहेत. तेल्हारा पंचायत समिती अंतर्गत एकूण ६१ ग्रामपंचायतींमध्ये जिल्हा परिषदेच्या १०४ शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समित्यांच्या बैठका नियमित घेण्यात येतात. सन २०१२-१३ नंतर शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना कोणतेही सुचना पत्रक आलेले नाही. संबंधित शाळा व्यवस्थापन समित्यांना शालेय व्यवस्थापन समितीला इतक्या वर्षाच्या कालावधीत अजूनही त्यांचे अधिकार काय आहेत, याची जाणीव नाही त्यामुळे शासकीय अनास्था असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शालेय व्यवस्थापन समितीमध्ये वाचन झाले पाहिजे याकरीता केंद्र प्रमुखावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी असे समितीचे मत आहे.

**माहे जून मध्ये शाळा सुरु होतात म्हणून शालेय व्यवस्थापन समितीची बैठक घेण्यात यावी. सदर बैठकीमध्ये तालुक्यातील शाळा डिजिटल करण्यासंदर्भात संबंधित खाते प्रमुखांनी जिल्हा नियोजन विकास समितीकडे निधीची मागणी करावी अशी समिती शिफारस करीत आहे व प्रस्तुत प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

अकोला जिल्ह्यामध्ये ख्रिस्टोफर यांनी ७ गावांना दत्तक घेतले आहे. ७ गावातील शिक्षक अतिशय वेगाने इंग्रजी बोलत आहेत. शालेय अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त विशेष प्राविण्य मिळविण्यासाठी अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. त्यामुळे २४ विद्यार्थी इंग्रजी माध्यमाची शाळा सोडून जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत आले आहेत. पालकांच्या मते इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये चांगले शिक्षण मिळेल असे वाटते मात्र तेथे गुणवत्ता मिळत नाही. इंग्रजी बोलणे हा भाग पालकांना आकर्षित करतो, त्या आधारे शालेय शिक्षण विभागाने धोरण आखले आहे. २९ हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. गत दोन वर्षात २७ हजार मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळा सोडून मराठी माध्यमाच्या शाळेत आली आहेत. त्यामुळे या शिक्षण पध्दतीकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ब्रिटीश कौन्सिलचे कोर्स ६ वर्षापासून सुरु आहेत. ब्रिटीश कौन्सिलने टाटा ट्रस्टच्या माध्यमातून तेजस नावाचा कार्यक्रम सुरु केला आहे. शालेय शिक्षण विभागाने ९ जिल्ह्यात एक वर्ष त्यांचा कार्यक्रम घेतला आहे. संपूर्ण ३६ जिल्ह्यात हा कार्यक्रम सुरु करण्यात येणार आहे. ब्रिटीश कौन्सिलचा तेजस नावाचा कार्यक्रम किंवा पाठ्यपुस्तकावर आधारित अस्तित्व नावाचा कार्यक्रम घेण्यासाठी शिक्षकांना पर्याय देण्यात आले आहेत. या स्तुत्य उपक्रमाबद्दल समिती समाधान व्यक्त करीत आहे.

**तथापि, राज्यामध्ये मराठी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थी संख्या कमी होणे याबद्दल समिती असमाधान व्यक्त करीत असून मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी संख्येत घट होऊ नये म्हणून संबंधित विभाग प्रमुखांनी योग्य ती काळजी घेऊन मराठी माध्यमातील विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी जनजागृती करावी अशी समितीची शिफारस आहे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्यांच्या आत समितीला पाठविण्यात यावा.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, अकोला (प्रशासन)

## एल.ई.डी खरेदी प्रकरणातील अनियमितता (पंचायत समिती, तेल्हारा)

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ जून, २०१७ या कालावधीत अकोला जिल्हा परिषदेच्या दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, एलईडी २८००/- रुपयांना मिळत असतांना देखील ४२००/- रुपये रक्केमेने खरेदी करण्याची कारणे काय आहेत ? तसेच याबाबतच्या तफावतीची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

एलईडी २८००/- रुपयांना मिळत असतांना देखील ४२००/- रुपये रक्केमेने खरेदी करण्याची कारणे काय आहेत, तसेच याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल समितीस सादर करावा ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मा. पंचायती राज समिती यांनी दिनांक २ जुन, २०१७ रोजी पंचायत समिती तेल्हारा अंतर्गत ग्रामपंचायत दापुरा, मनब्दा व भांबेरी येथे प्रत्यक्ष भेट दिली असता एल.ई. डी. लाईट २८००/- रुपयांना मिळत असतांना देखील रु. ४२००/- रक्कमेने खरेदी करण्याची कारणे काय आहेत, याबाबत उपस्थित मुद्याच्या अनुषगांने सविस्तर चौकशी केली असता ग्रामपंचायत दापुरा येथे रु. ४०००/- दराने Havells या कंपनीचे ३० वॅट क्षमतेचे यंत्र खरेदी केलेले आहेत. तसेच ग्रामपंचायात मनब्दा येथे रु.४०००/- दराने Havells या कंपनीचे ३० वॅट क्षमतेचे लाईट खरेदी केलेले आहेत व ग्रामपंचायत भांबेरी येथे रु. २४३०/- दराने Rayon या कंपनीचे ३६ वॅट क्षमतेचे यंत्र खरेदी केलेले आहेत. सन २०१६-२०१७ या वर्षात वरील ग्रामपंचायतीने १४ व्या वित्त आयोगात प्राप्त झालेल्या निधीतून खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. खरेदी केलेल्या साहित्याच्या किंमती मधील तफावत ही पुरवठादार कंपनी व लाईटची क्षमता यामुळे येत असल्याचे दिसुन आले.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागचे अभिप्राय** :- प्रस्तुत प्रकरणी जिल्हा परिषदेकडून चौकशी करण्यात आली असून जिल्हा परिषदेच्या अभिप्रायास सहमती दर्शविण्यात येत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३० मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, एलईडी २८०० रूपयांना मिळत असताना देखील ४२०० रूपयांनी खरेदी करण्याची कारणे काय आहेत, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, गटविकास अधिकारी यांच्या मार्फत तत्संदर्भात चौकशी करण्यात आली आहे. कंपनी आणि व्हॅट यामुळे तो फरक आहे असा चौकशी अहवालात निष्कर्ष आला आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, सविस्तर अहवाल समितीस सादर करावा.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने पंचायत समिती, तेल्हारा अंतर्गत ग्रामपंचायत दापुरा, मनब्दा व भांबेरी येथे प्रत्यक्ष भेट दिली असता बाजारात एल.ई.डी.लाईट प्रत्येकी रूपये २८००/- या किंमतीत मिळत असतांना देखील त्यांची रूपये ४२००/- च्या भावाने खरेदी करण्यात आली आहे, याचे कारण काय अशी समितीने विचारणा केली असता ग्रामपंचायत दापुरा व मनब्दा येथे रूपये ४०००/- दराने Havells या कंपनीचे ३० वॅट क्षमतेचे व ग्रामपंचायत भांबेरी येथे रूपये २४३०/- दराने Rayan या कंपनीचे ३६ वॅट क्षमतेचे लाईट खरेदी केले असून १४ व्या वित्त आयोगातून प्राप्त झालेल्या निधीतून खरेदी केलेल्या साहित्याच्या किंमती मधील तफावत ही पुरवठादार कंपनी व लाईटची क्षमता यामुळे दिसून येत असल्याचे दिनांक ३० मे, २०१८ रोजीच्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले असले तरी रुपये १५७०/- एवढ्या किंमतीचा फरक दिसून येत आहे. त्यामुळे **एल.ई.डी. दिवे खरेदीबाबत ग्रामविकास विभागाने पुरवठादार कंपनी व लाईटची क्षमता आणि दर यामध्ये एकसुत्रीपणा यावा याद्दष्टीने सुयोग्य पध्दतीने नियोजन करावे तसेच या खरेदी प्रक्रियेत दिव्यांची किंमत कमी जास्त असण्याच्या बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर चौकशी करण्यात यावी व त्यात कोणी दोषी आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्यांच्या आत समितीला पाठविण्यात यावा.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, अकोला (प्रशासन)

### लाभार्थ्यांना १०० म्हशींचे वाटप करुनही लाभ न मिळाल्याबाबत (पंचायत समिती, तेल्हारा)

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ जून, २०१७ या कालावधीत अकोला जिल्हा परिषदेच्या दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान दापूरा तालुका, तेल्हारा पंचायत समिती येथे समितीने भेट दिली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, या गावामध्ये दुधाळ जनावरांचे अनेक लाभार्थ्यांना वाटप करण्यात आल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले, परंतू समितीने या गावातील श्रीमती,सुनंदा प्रकाश वानखडे, श्री.प्रविण जनार्दन वानखडे, श्री.उत्तम दशरथ वानखडे, श्री.रामकृष्ण वानखडे या लाभार्थ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की,आम्हाला ७ हजार रूपये दिले आणि आमच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या त्या अनुषंगाने समितीने असे निदर्शनास आणून दिले की, समितीने त्याचे व्हीडीओ रेकॉर्डींग सुध्दा करुन आणलेले आहे. या योजनेत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. सन २०१०-२०११ ते आतापर्यंत वाटप केलेल्या लाभार्थ्यांची यादी उपलब्ध करुन देण्यास सांगितले असता सदरहू यादी उपलब्ध करुन दिलेली नसल्याने याबाबत लाभार्थ्यांची गावनिहाय यादीसह अहवाल समितीला सादर करावा असे निदेश देण्यात आले.

तसेच जनावरे खरेदी केल्याच्या पावत्या आहेत, त्यासंदर्भात वेगळी चौकशी करुन सर्व माहितीसह अहवाल समितीकडे पाठविण्यात यावा. ही सर्व माहिती कागदोपत्री आली पाहिजे. सन २०१० पासून ते आतापर्यंत शासनामार्फत जवळपास १०० म्हशींचे वाटप केलेले आहे, परंतु लाभार्थ्यांना त्या मिळालेल्या नाहीत. गरीब कुटुंबांसाठी पंडीत दीनदयाळ उपाध्याय योजना हे वर्ष साजरे करीत असतांना गरीबांपर्यंत ही योजना पोहचावयाची आहे. विदर्भात आत्महत्या होऊ नयेत म्हणून शासनामार्फत या योजना राबविल्या जातात. दुधाळ जनावरांचे वाटप केलेले आहे त्यासंदर्भात वस्तुनिष्ठ अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१० पासुन ते आजतागायत शासनामार्फत जवळपास १०० म्हशीचे वाटप करूनही लाभार्थ्यांना लाभ न मिळण्याची कारणे काय आहेत व त्याची सद्य:स्थिती काय आहे ? पंचायत समिती मध्ये जनावरांचे वाटपात झालेल्या अनियमिततेसंदर्भात संबधितांवर कोणती कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती, तेल्हारा अंतर्गत पशुसंवर्धन विभागाचे माध्यमातुन सन २०११-१२ ते सन २०१६-१७ या कालावधीत विशेष घटक योजना ७५ टक्के अनुदानावर अनुसुचित जातीच्या लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांचे वाटप करणे ही योजना राबविण्यात आली असून सन २०११-१२ मध्ये ८ लाभार्थी मंजूर करून ८ ही लाभार्थ्यांना म्हशीचे वाटप करण्यात आले आहे. सन २०१२-१३ या वर्षात सदर म्हशी वाटपाची योजना राबविण्यात आलेली नाही. सन २०१३-१४ मध्ये ९ लाभार्थी मंजूर करून ९ लाभार्थ्यांना म्हशींचे वाटप करण्यात आले. सन २०१४-१५ मध्ये १० लाभार्थी मंजुर करून १० लाभार्थ्यांना म्हशीचे वाटप करण्यात आले आहे. सन २०१५-१६ मध्ये ३५ लाभार्थी मंजुर करून ३५ लाभार्थ्यांना म्हशीचे वाटप करण्यात आले आहे. सन २०१६-१७ मध्ये ४२ लाभार्थी मंजुर करून ४२ लाभार्थ्यांना म्हशीचे वाटप करण्यात आले आहे असे एकूण १०४ लाभार्थी मंजूर करून १०४ लाभार्थ्यांना म्हशीचे वाटप करण्यात आलेले आहे.

सदर निवड झालेल्या लाभार्थ्यांना त्यांच्या पसंतीने मान्यता प्राप्त बाजारातून खरेदी समिती समक्ष म्हशी खरेदी करून देऊन लाभ देण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने बाजार पावती,म्हैस मिळाल्याची लाभार्थ्यांची ताबा पावती, लाभार्थ्यांचा म्हशी सोबतचा फोटो खरेदी समितीचा अहवाल, विक्रेत्याची रक्कम मिळाल्याबाबतची पावती इत्यादी आवश्यक दस्ताऐवज वेळीच घेण्यात आलेले आहेत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी याबाबत चौकशी केली असून तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, डॉ.मेहरे यांचे कार्यकाळात लाभार्थी निवड प्रक्रिया पार पडली असून त्यानंतरचे प्रभारी डॉ.गोळे यांचे कार्यकाळात जनावरे खरेदी करण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. जनावरे खरेदी ही नेमून दिलेल्या समितीमार्फत करण्यात आलेली आहे. जनावरे खरेदी करण्याची प्रक्रिया डॉ.मिश्रा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे कार्य कालावधीत झालेली नसल्यामुळे डॉ.मिश्रा, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करता येणार नाही.

तसेच योजने अंतर्गत श्रीमती सुनंदा प्रकाश वानखेडे, श्री.प्रविण जनार्दन वानखेडे, श्री. रामकृष्ण वानखेडे यांनी म्हशी खरेदी केले बाबतचे प्रतिज्ञापत्र खरेदी पावती, विमा प्रमाणपत्र इत्यादी बाबी संबंधितांनी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयात जमा केलेल्या आहेत. जनावरे शेतकऱ्यांनी बाजारातून विकत घेतले असलेबाबत बाजार समितीची पावती व फोटोग्राफ सादर केलेले आहेत. संपूर्ण खरेदी प्रक्रिया नियमानुसार पार पडलेली असून यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३० मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लाभार्थ्यांना म्हशींचे वाटप करुनही लाभार्थ्यांना त्याचा लाभ न मिळण्याची कारणे काय आहेत ? याबाबत सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी खुलासा केला की, सन २०११-१२ ते सन २०१६-१७ या कालावधीत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांचे वाटप करण्याची योजना होती. सन २०११-२०१२ मध्ये ८ लाभार्थी मंजूर करुन त्यांना म्हशींचे वाटप करण्यात आले. सन २०१२-२०१३ मध्ये सदर योजना राबविण्यात आली नाही. सन २०१३-२०१४ मध्ये ९ लाभार्थ्यांची निवड करुन त्या सर्वांना म्हशींचे वाटप करण्यात आले. सन २०१४-२०१५ मध्ये १० लाभार्थ्यांची निवड होऊन त्या सर्वांना म्हशींचे वाटप केलेले आहे. सन २०१५-२०१६ मध्ये ३५ लाभार्थ्यांची निवड करुन ३५ लाभार्थ्यांना म्हशींचे वाटप करण्यात आले, तर सन २०१६-२०१७ मध्ये ४२ लाभार्थी मंजूर करुन त्या सर्वांना म्हशींचे वाटप करण्यात आले आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, जनावरांचे वाटप करताना जनावरांच्या कानाला स्टॅग करतो. समितीने लाभार्थ्यांच्या घरी भेट दिली तेव्हा तिथे ही जनावरे आढळून आली नाहीत, यावर सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी विदित केले की, सन २०११-२०१२ ते सन २०१६-२०१७ या कालावधीत एकूण १०४ लाभार्थ्यांना १०४ म्हशींचे वाटप करण्यात आले. या संदर्भात खरेदी समिती आहे. त्या समितीमध्ये पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचा समावेश असतो आणि त्यामध्ये इतर सदस्य असतात. निवड झालेल्या लाभार्थ्यांना त्यांच्या पसंतीने मान्यता प्राप्त बाजारातून खरेदी समिती समक्ष जनावराची खरेदी करण्यात येते. त्याशिवाय खरेदी केल्याची पावती, लाभार्थ्यास म्हैस मिळाल्याची पावती, लाभार्थ्यांचा म्हशीसोबत फोटो काढण्यात येतो. ज्याच्याकडून म्हैस विकत घेतली त्याच्याकडून म्हैस विकत घेतल्याची पावती घेतो. सदरची खरेदी प्रक्रिया नियमानुसार पार पाडलेली आहे. तसेच या प्रकरणी कोणीही तक्रार केलेली नाही. जिल्हापरिषदेने सादर केलेली माहिती तपासली असून त्या माहितीशी सचिव, पशुसंवर्धन विभाग सहमत आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सर्व गोष्टी नियमानुसार झाल्या आहेत. प्रश्न असा आहे की, समितीने लाभार्थ्यांच्या घरी भेट दिली त्यावेळी समितीला वाटप केलेली जनावरे सापडली नाहीत. ज्या लाभार्थ्याला लाभ देण्यात येतो त्याच्या घरी जनावरे आहेत की नाही, हे अधिकारी पाहत नाहीत काय ? तसेच दुधाळ जनावरांचे वाटप केल्याचे फक्त कागदोपत्री दाखविण्यात आले. समितीने गावातील श्रीमती सुनंदा वानखेडे, प्रवीण जर्नादन वानखेडे, श्री.रामकृष्ण वानखेडे या लाभार्थ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, सात हजार रुपये दिले आणि आमच्या स्वाक्षऱ्या कागदोपत्री घेण्यात आल्या हे खरे आहे काय, याबाबत सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी विदित केले की, अशाप्रकारची कोणतीही तक्रार पंचायत समितीकडे प्राप्त झालेली नाही. याबाबत पुढे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, जवळपास २५ टक्के जनावरे आहेत. ही तीन वर्षाची योजना होती. बरेचसे लाभार्थी पाच-सहा महिने दुधाचा धंदा करतात आणि नंतर म्हशी विकतात किंवा दुसरी बदलून घेतात. काही वेळेला मुलांच्या किंवा मुलींचे लग्नकार्य, काही वेळेला चारा टंचाईमुळे विक्री करणे, कधी कधी दुधाच्या मार्केटचा प्रश्न निर्माण होतो त्यामुळे म्हशी विकतात. जनावर विकले म्हणून लाभार्थ्यांवर कोणतीही कारवाई करु शकत नाही. काही वेळेला लाभार्थी पहिले जनावर विकून दुसरे जनावर विकत घेतात.

तद्नंतर समितीच्या निदर्शनास आले की, परशुराम पाटील यांच्यासह १० लाभार्थी व ३ गावांमध्ये पाहणी केली असता कोणत्याही ठिकाणी म्हशी आढळून आल्या नाहीत. ही अतिशय गंभीर बाब आहे. यामध्ये मोठया प्रमाणात गलथानपणा आहे. म्हशींची खरेदी केलेली आहे त्यामध्ये पावती क्रमांक वेगवेगळा आहे. तत्कालिन समिती प्रमुखांनी विभागीय चौकशीचे आदेश दिलेले होते त्याची अंमलबजावणी करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

समितीने पुढे लाभार्थ्यांच्या आर्थिक उन्नतीकरिता गाई, म्हशींचे वाटप केले जाते. त्यांच्या बळकटीकरणासाठी ही योजना राबवली जाते. योजना योग्य प्रकारे राबवली जात आहे की नाही हे तपासण्याची जबाबदारी आपली आहे. आता समितीने भेट दिली तर तेथे जनावरे दिसतील काय असा उपप्रश्न विचारला असता तालुका पशुधन विकास अधिकारी यांनी समितीस पुढील प्रमाणे माहिती दिली की, आम्ही लाभार्थ्यांना सांगतो. आता आपल्याला २५ टक्के जनावरे दिसतील. अनेकदा जनावरे बदलली जातात. एखादी म्हैस दूध देत नसेल तर ती बदलली जाते. त्यामुळे आता तीच जनावरे असतील असे सांगता येत नाही. यावर सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी खुलासा केला की, याबाबत शासनाचा असा निर्णय आहे की, पशुधन विकास अधिकारी यांनी जनावरांची तपासणी केली पाहिजे. एलडीओ, डीएचओ आरजेसी यांनी किती टक्के जनावरांची तपासणी करावी हे निश्चित केलेले आहे.

आपण एखाद्या जिल्ह्यामध्ये अचानक भेट दिली पाहिजे अशी समितीने विचारणा केली असता त्याबाबत सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी बुलढाणा जिल्ह्याच्या साक्षीच्या वेळी आपण मला हा प्रश्न विचारला होता, त्यावेळी देखील मी सांगितले होते की, जनावरांच्या तपासणी बाबत कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. पंचायत समिती स्तरावर नोंदवही ठेवायची आहे. तशी नोंदवही तेथे आहे. आमच्या यंत्रणेमार्फत लाभार्थ्यांकरिता जागरुकता शिबीर लावणे आवश्यक असल्याचे दिसत आहे. लाभार्थ्यांनी अधिकाधिक जनावरे पाळून आपले आर्थिक उत्पन्न वाढवले पाहिजे. या संबंधी आयुक्त स्तरावरुन निर्देश देण्यात येतील. तसेच मंत्रालयीन स्तरावरुन एक पथक नियुक्त करण्यात येईल असे समितीस आश्वस्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती, तेल्हारा अंतर्गत पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून सन २०११-१२ ते सन २०१६-१७ या कालावधीत विशेष घटक योजनेतून ७५ टक्के अनुदानावर अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांचे वाटप करण्याची योजना राबविण्यात आली. समितीने दिनांक ०२ जून, २०१७ रोजी पंचायत समिती तेल्हारा येथे लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या म्हैशीची प्रत्यक्ष पाहणी केली असता जनावरांचे वाटप करतांना कानाला स्टॅग केलेली जनावरे आढळलेली नाहीत. समितीने गावातील श्रीमती सुनंदा वानखेडे, श्री. प्रविण जनार्दन वानखेडे व श्री. रामकृष्ण वानखेडे या लाभार्थ्यांकडे विचारणा केली असता सात हजार रुपये देऊन त्यांच्या कागदोपत्री स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. यावरुन संबंधित अधिकारी लाभार्थ्यांच्या घरी जाऊन प्रत्यक्षात पाहणी करीत नाहीत, तसेच **दुधाळ जनावरांचे वाटप केल्याचे फक्त कागदोपत्री दाखविण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे त्यामुळे ही बाब अतिशय गंभीर आहे. यामध्ये मोठया प्रमाणात गलथानपणा झालेला आहे असे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

तेल्हारा पंचायत समिती अंतर्गत दुधाळ जनावरांचे वाटप करण्याची योजना राबविलेली आहे, परंतु प्रत्यक्षात समितीने पाहणी केली असता त्याचा लाभ लाभार्थ्यांना मिळालेला नाही. समितीने त्याचे व्हिडीओ रेकॉर्डींग सुध्दा करुन आणलेले आहे. त्या योजनेत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. सन २०१०-११ ते अद्यापपर्यंत वाटप केलेल्या लाभार्थ्यांची यादी देण्यास सांगितले होते, परंतु ती दिलेली नाही. **सबब लाभार्थ्यांची यादी, गावनिहाय अहवाल समितीला सादर करावा, जनावरे खरेदी केलेल्या पावत्या आहेत, त्यासंदर्भात वेगळी चौकशी करण्यात यावी व उपरोक्त प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कडक स्वरुपाची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा सर्वंकष अहवाल दोन महिन्याच्या आत समितीकडे पाठविण्यात यावा असे अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, अकोला (प्रशासन)

## तेल्हारा पंचायत समितीच्या गोदामात सायकली वाटपाअभावी पडून असल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ जून, २०१७ या कालावधीत अकोला जिल्हा परिषदेस भेट दिली. समितीने भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली. पंचायती राज समितीच्या गटांनी पंचायत समित्यांना भेटी दिल्या त्यावेळी तेथील गोदामाची पाहणी केली असता तेथे ५० ते ७० सायकली, शेगडी व इतर साहित्य गेल्या १० वर्षापासून शिल्लक असल्याचे निदर्शनास आले. सन २०१२-१३ मध्ये जे प्रस्ताव आले त्यासाठी निधीची तरतूद करता आलेली नाही. निधी उशिरा आला असे सांगण्यात येते, परंतु याबाबत साशंकता निर्माण होत असल्याने सविस्तर माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, याबाबत अनेक गोदामामधील साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. सर्व जिल्ह्यात अशीच परिस्थिती आहे.

तद्नंतर समितीने पुढे विचारणा केली की, बार्शीटाकळी पंचायत समिती मधील गोडाऊनमध्ये गेल्या १० वर्षापासून सायकली वापराविना पडून असून त्या सायकली आता जुन्या झाल्या आहेत. २० टक्के रक्कमेतून सदरहू सायकली खरेदी करण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांची यादी तयार करुन सदरहू यादी मंजूर झाल्यानंतर सायकल वाटप सुरु असताना अर्ध्या सायकली वाटप झाल्यानंतर वाटप थांबविण्याचा आदेश देण्यात आला. समाज कल्याण अधिकारी यांनी वाटप बंद करावे असा शेरा नोंदवहीत नमूद करुन स्वाक्षरी करण्यात आली आहे. त्यानंतर दोन ते चार महिने प्रस्ताव आला नव्हता. किती सायकली वाटप केल्या व किती शिल्लक आहेत. सायकल खरेदी केल्यावर समाजकल्याण अधिकारी यांनी सायकल वाटप थांबविण्याचे कारण काय आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, समाजकल्याण अधिकारी यांनी सायकल वाटप न करण्याचा शेरा मारला होता हे लक्षात आले होते. त्यानंतर दोन ते चार महिने प्रस्ताव आला नव्हता. किती सायकली वाटप केल्या व किती सायकली शिल्लक आहेत याचा अहवाल त्यानंतर दिलेला आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, पंचायत समिती, तेल्हारा येथील गोदामामधील सायकली गंजल्या आहेत, १० वर्षापासून सायकली वापराविना पडून आहेत. तेथे स्वच्छता नाही, सायकली का वाटप करण्यात आल्या नाहीत याचे उत्तर मिळत नसल्यामुळे समितीचे समाधान झालेले नाही. याबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

तद्नंतर समाज कल्याण अधिकारी कोण होते त्यांना बोलविण्यात आले आहे काय अशी विचारणा समितीने केली असता त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, त्यावेळी श्री. बी.डब्ल्यू चव्हाण हे समाज कल्याण अधिकारी होते ते आता यवतमाळ येथे कार्यरत आहेत. त्यांना चौकशी करिता बोलविण्यात आले होते. सायकल वाटप करण्याचा ठराव सर्वसाधारण बैठकीत झाला असताना अर्ध्या सायकली वाटल्यानंतर वाटप रद्द करण्याचे आदेश का देण्यात आले व आदेशावर कोणाची सही आहे, त्याबाबत सदरहू सही माझी नाही असे समाज कल्याण अधिकारी यांनी समितीसमोर सांगितले.

सन २०१३-१४ मध्ये डॉ. सलील, समाज कल्याण अधिकारी होते अशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला माहिती दिली. तत्कालिन समाज कल्याण अधिकारी यांनी माहिती दिली की, त्या काळातील समाज कल्याण अधिकारी यांचे निधन झाले आहे. लाभार्थ्यांची यादी तयार करुन जिल्हापरिषदेची मान्यता घेण्यात आली होती. त्यावेळी काही जिल्हापरिषद सदस्य लाभार्थ्यांच्या यादीच्या विरोधात मा. न्यायालयात गेले होते, त्यामुळे सायकल वाटपाचा कार्यक्रम थांबविण्यात आला होता. त्यानंतर सायकल वाटपाचे आदेश देण्यात आले नाहीत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सायकल व इतर माल गोदामामध्ये पडला आहे, लाभार्थ्यांना सायकलीचे वाटप करण्यात आले नाही. याबाबत तत्कालिन समाज कल्याण अधिकारी यांनी माहिती दिली की, सुरुवातीला लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा दुसरी यादी तयार करण्यात आली होती. सन २०१२-१३ मधील सायकलींचे वाटप करण्याचे आदेश गट विकास अधिकारी यांना देण्यात आले होते. सदरहू योजनेत किती सायकली वाटप करण्यात आल्या याची यादी समितीस सादर करावी असे समितीने निदेश दिले.

समितीने पुढे विचारणा केली की, आता गोडाऊनमध्ये ज्या सायकली पडल्या आहेत, त्यांना गंज चढला असल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यावेळी जे लाभार्थी होते ते लाभापासून वंचित राहिले आहेत. शासनाचे नुकसान होऊन निधीचा अपव्यय झाला आहे. आपण दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, याबाबत पाहणी करण्याचे काम समाज कल्याण अधिकारी यांचे नव्हते काय असा उपप्रश्न विचारला असता तत्कालिन समाज कल्याण अधिकारी यांनी त्यानंतर समाज कल्याण विभागाचा कार्यभार माझ्याकडे नव्हता असे सांगितले.

समितीने पुढे विचारणा केली की, अशा प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती घेऊन कार्यवाही करणे आवश्यक होते. या जिल्हापरिषदेमध्ये मागील अधिकाऱ्यांनी जे काम केले ते पुढे करण्यास कोणीही तयार असल्याचे दिसत नाही. शासनाच्या योजनांची नीटपणे अंमलबजावणी करणे हे पदावर असलेल्या अधिकाऱ्याचे काम आहे. योजना अपूर्ण असेल तर ती पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी पुढील अधिकाऱ्याची असते. असा प्रकार आतापर्यंत कोणत्या जिल्हा परिषदेमध्ये समितीला पहावयास मिळला नाही. येथील अधिकारी कामही नको आणि जबाबदारी नको अशा मानसिकतेमध्ये काम करीत आहेत ही बाब योग्य नाही. जिल्हा परिषदेचा विकास व जिल्ह्यातील गरीब, सामान्य गरजू लोकांना मदत करण्याची भूमिका अधिकाऱ्यांची असायला पाहिजे अशी समितीमार्फत शिफारस करण्यात आली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

तेल्हारा पंचायत समितीच्या गोडावुनमध्ये सायकली वाटपाअभावी पडुन असल्यामुळे लाभार्थ्यांना लाभ न दिल्याने त्यास जबाबदार कोण आहेत व हलगर्जीपणा करणाऱ्या संबधितांविरुध्द नियमानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समितीच्या गोडावून मध्ये असलेले शिल्लक साहित्य सन २००९-१० ते २०१०-११ या कालावधी मधील असुन जिल्हा परिषद समाजकल्याण सेस या योजने अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. सन २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाकडून अपंग लाभार्थ्यांना ३ चाकी सायकल पुरविणे बाबत १८ नग प्राप्त असुन १५ नग वाटप करण्यात आले उर्वरीत ३ नग लाभार्थ्यांना वेळोवेळी कळवून सुध्दा उचल न केल्याने शिल्लक आहेत.

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात मागासवर्गीयांना लेडीज सायकल पुरविणे करिता २५ नग प्राप्त असून ८ नग वाटप करण्यात आले. उर्वरित १७ नग लाभार्थ्यांच्या प्रतिसादाअभावी शिल्लक आहेत.

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात मागासवर्गीयांना जेन्टस सायकल पुरविणे करीता १५ नग प्राप्त असुन ८ नग वाटप करण्यात आले. उर्वरित ७ नग लाभार्थ्यांच्या प्रतिसादाअभावी शिल्लक आहेत.

जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी परवानगीशिवाय साहित्य वाटप न करण्याच्या सुचना साठा नोंदवहीवर दिलेल्या असल्याने सदर साहित्याचा साठा शिल्लक आहे. त्यामुळे तत्कालीन जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना नोटिस देवून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचा अभिप्राय :-** लाभार्थ्यांना वेळोवेळी कळवून सुध्दा उचल न केल्याने सायकली शिल्लक आहेत. तसेच जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग यांचेकडून तातडीने उर्वरित लाभार्थ्यांची सुधारित मंजूर यादी पंचायत समिती, तेल्हारा यांना पाठविण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना निर्देश देण्यात येत आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३० मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, तेल्हारा पंचायत समितीच्या गोडाऊन मध्ये सायकली वाटपाअभावी पडून असल्यामुळे लाभार्थ्यांना लाभ न दिल्याने, त्यास जबाबदार कोण आहे आणि हलगर्जीपणा करणाऱ्यांविरुध्द नियमानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे, तसेच सदरहू सायकली वाटपाविना पडून आहेत काय, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदरहू सायकली वाटपाविना पडून आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, सायकली केव्हापासून पडून आहेत, तसेच विलंब लागण्याची व गोडाऊन मध्ये ठेवण्याची कारणे काय आहेत, सदरहू सायकली केव्हापासून पडून आहेत, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २००९-१० व २०१०-११ या कालावधीतील सायकली आहेत. ट्यूब खराब झालेल्या आहेत.

तद्नंतर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, टयूब बदलून घेत आहोत. त्यावर समितीने असे निदेश दिले की, सेस फंड वापरावा आणि ट्यूब लावून गरिबांना सायकलीचे वाटप करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, अकोला येथे भेट देऊन वार्षिक प्रशासन अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिका-यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषदेच्या सन २००९-१० ते २०१० ते २०११ या कालावधीत समाज कल्याण विभागाने सेस योजनेतंर्गत अपंग लाभार्थ्यांना तीन चाकी सायकलीचे १८ नग, सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात मागासवर्गीयांना लेडिज सायकल २५ नग आणि पुरूष सायकल १५ नग प्राप्त झाले होते, अपंग सायकलीचे ३ नग लाभार्थ्यांना कळवून देखील कोणीही त्याची उचल केली नाही. लेडिज सायकलीचे प्रतिसादाअभावी १७ नग आणि पुरूष सायकलीचे ७ असे एकूण २४ नग शिल्लक होते. समितीने दिनांक ३ जून,२०१७ रोजी पंचायत समिती तेल्हारा येथे भेट दिली असता पंचायत समितीच्या गोदामामध्ये वाटपाअभावी १५ सायकली पडून असल्याचे समितीच्या निदर्शनात आले. साहित्याची निवड प्रक्रिया सक्षम प्राधिकारी यांच्याकडून झालेली नसल्याने मागासवर्गीय लाभार्थ्यांना लाभ देता आलेला नाही, याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

बार्शिटाकळी पंचायत समितीमधील गोदामामध्ये गेल्या १० वर्षापासून सायकली पडून आहेत. या सायकली २० टक्के रकमेतून खरेदी करण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांची यादी तयार करुन ती मंजूर झाल्यावर सायकल वाटप सुरु असताना अर्ध्या सायकली वाटप झाल्यावर वाटप थांबविण्याचा आदेश देण्यात आला. समाजकल्याण अधिकाऱ्यांनी वाटप बंद करावे असा नोंदवहीवर शेरा मारलेला होता हे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या लक्षात येऊन सुध्दा त्यांनी समाजकल्याण अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई केलेली नाही. त्याचप्रमाणे पंचायत समिती, तेल्हारा येथील गोडाऊनमधील सायकली १० वर्षापासून पडून असल्यामुळे गंजूर गेल्या आहेत. त्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय

झाला आहे. तसेच त्यावेळी जे लाभार्थी होते ते देखील लाभापासून वंचित राहिले आहेत. उपरोक्त प्रकरणामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती घेऊन कार्यवाही करणे आवश्यक होते.

जिल्हा परिषदेमधील तत्कालिन अधिकाऱ्यांनी जे काम पूर्ण करणे अपेक्षित होते ते काम पूर्ण करण्यास त्या पदावर रुजू झालेल्या अधिकाऱ्याने केल्याचे दिसून येत नाही. शासकीय योजनांची नियोजन बध्दरित्या नियमानुकूल अंमलबजावणी करणे हे त्या पदावर काम करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याचे काम आहे. योजना अपूर्ण असेल तर ती पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी त्या पदाचा कार्यभार घेणाऱ्या अधिकाऱ्याची असते असा प्रकार आतापर्यंत कोणत्याही जिल्हा परिषदेमध्ये समितीला पहावयास मिळाला नाही. अकोला जिल्हा परिषदेमध्ये काही अधिकारी कामही नको आणि जबाबदारीही नको अशा मानसिकतेमध्ये असल्याचे दिसून येत आहे, ही बाब योग्य नाही. जिल्हा परिषदेचा विकास व जिल्ह्यातील सामान्य गरजू गरीब लोकांना मदत करण्याची भूमिका अधिकाऱ्यांची असायला पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**प्रस्तुत प्रकरणी व एकूणच अकोला जिल्हा परिषदेत अत्यंत हलगर्जीपणे कामे होत आहेत. सन २०१२-१३ पासून समाजकल्याण, महिला व बालकल्याण आणि दिव्यांगांकरीता असलेल्या योजना तत्कालिन अधिकाऱ्यांना व्यवस्थितरित्या राबविता आल्या नाहीत ही अतिशय गंभीर बाब आहे. सर्व मागासवर्गीय लाभार्थी, विद्यार्थी, महिला व बालके यांच्यासाठी ज्या योजना असतात त्यामध्ये साहित्याचे वाटप करण्यास विलंब लावला जातो. परिणामी त्या योजनेची फलश्रुती होत नाही. त्यामुळे या सर्व प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करुन तत्कालिन दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, अकोला (प्रशासन)

### गोरेगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची इमारत नादुरुस्त असून उपकेंद्रामध्ये औषधांचा अभाव असल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ जून, २०१७ या कालावधीत अकोला जिल्हा परिषदेस भेट दिली. समितीने दिनांक २ जून, २०१७ रोजी पंचायत समिती, अकोला अंतर्गत गोरेगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची पाहणी केली असता सदरहू उपकेंद्रातील शौचालयाचे काम अपूर्ण व निकृष्ठ दर्जाचे आढळून आले तसेच उपकेंद्राची अवस्था अतिशय वाईट असल्याचे समितीस आढळून आले व त्या ठिकाणी मुदतबाहय झालेली औषधे ठेवण्यात आल्याचे आढळून आले. सदरहू उपकेंद्राच्या खोल्यांच्या खिडक्यांच्या काचा फुटलेल्या आढळून आल्या तसेच नियमानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी उपकेंद्राला भेटी दिलेल्या नाहीत.

तसेच सदरहू भेटीच्या वेळी तालुका आरोग्य अधिकारी हे त्यावेळी उपस्थित होते. त्यांना समितीने काही प्रश्न विचारले असता त्यांना एकाही प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. माननीय पंतप्रधान हे संपूर्ण देशाला "स्वच्छ भारत" असा संदेश देत आहेत आणि दुसरीकडे उपकेंद्रातील अस्वच्छता समितीच्या निदर्शनास आली. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सदर आरोग्य उपकेंद्राची एका महिन्याच्या आत दुरुस्ती केली जाणार आहे असे समितीला विदित केले.

तद्नंतर समितीने आणखी पाहणी केली असता नवजात बालकांचा जन्म झाल्यानंतर त्याच्या नाळेला जी चाफ (क्लिप) लावला जातो त्याचा समाप्ती दिनांक (एक्सपायरी डेट) संपून तीन वर्षे झालेले औषध त्या ठिकाणी आढळून आले. याबाबत संबंधित जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करावी असे समितीने निदेशित केले.

तद्नंतर समितीने दिनांक ३ जून, २०१७ रोजी वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ बाबत चर्चा करीत असताना असे मत व्यक्त केले की, गोरेगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची पाहणी केली असता सदरहू उपकेंद्रातील शौचालयाचे काम अपूर्ण व निकृष्ठ दर्जाचे आढळून आले तसेच उपकेंद्राची अवस्था अतिशय वाईट असल्याचे आढळून आले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू इमारत नादुरुस्त आहे. ती दोन महिन्यांच्या आत दुरुस्त करुन घेतली जाईल.

तद्नंतर समितीने पुढे विचारणा केली की, पळसो (बढे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची देखील अवस्था अत्यंत वाईट आहे. सदर आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर आणि आवश्यक तो कर्मचारी वर्ग नियमितपणे उपस्थित नसतो. गावातील गरीब रुग्णांना बाहेरुनच औषधे खरेदी करावी लागतात, अशी वाईट अवस्था आहे. डॉक्टर केव्हाही अवेळी येत असल्यामुळे रुग्णांना आरोग्य तपासणी व औषधोपचारापासून वंचित राहावे लागत असल्याने यासंदर्भात संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा असे निदेश दिले. तसेच पळसो येथील निवासस्थान आणि ओटीची कामे करण्यासाठी बांधकाम विभागाबरोबर पत्र व्यवहार केलेला आहे. अंदाजपत्रक बनविण्यात आलेले असल्याने लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन पळसो येथील कामे पूर्ण करुन घेतली जाणार आहेत. तसेच या संबंधी कार्यवाही करुन समितीला याबाबतचा अहवाल सादर करण्यात येईल असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीला विदित केले.

तद्नंतर समितीच्या निदर्शनास आले की, सदरहू उपकेंद्रामध्ये कुत्रा चावल्यानंतर जे इंजेक्शन दिले जाते, ते देखील नव्हते. समितीने जी औषधे जप्त केली होती, ती समितीकडे पुढील कार्यवाही करण्यासाठी देत आहे. अनबायलीकल कोड क्लॅम्प हे नवजात बालकांच्या नाळेला लावले जाते. सदरहू औषध हे सन २०१५ मध्ये समाप्ती दिनांक झाल्याचे समितीला आढळून आले. समितीच्या रेकॉर्डसाठी काही औषधे अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आली असता त्याबाबत जिल्हा

आरोग्य अधिकारी यांनी खुलासा केला की, संबंधितांकडून वसूली करण्यात येईल. तसेच दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित करुन त्यांची विभागीय चौकशी केली जाईल.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदरहू उपकेंद्रामध्ये औषधांचा तुटवडा आहे किंवा कसे हे तपासण्याची जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांची असून आवश्यक ती औषधे लवकरात लवकर पुरविण्यात यावी, जिल्हा आरोग्य अधिकारी या नात्याने औषधे पाठविण्याचे काम त्यांचे आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातून उप केंद्राकडे औषधी दिली जातात. औषधांची ऑनलाईन डिमांड जनरेट होते. यावर उप केंद्राकडून औषधांची मागणी जनरेट झाली नव्हती काय असा उपप्रश्न उपस्थित केला असता त्याबाबत हे काम वैद्यकीय अधिकाऱ्याचे असते असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीस अवगत केले.

समितीने विचारणा केली की, तालुका वैद्यकीय अधिकाऱ्याकडून खुलासा प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. उप केंद्रामध्ये औषधे आहेत किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याचे काम जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे आहे. यासंदर्भात वेळोवेळी आढावा घेण्याची आवश्यकता असतांना असे कोणतेही काम जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केलेले नाही. संबंधित वैद्यकीय अधिकारी यांना निलंबित करुन काय साध्य करणार असे समितीने मत प्रकट केले असता त्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी विदित केले की, त्यांना तीन वेळा तपासणी यादी दिलेली होती. तसेच औषधांची मागणी द्यावी अशी मागणी सुध्दा केली होती. रुग्णालयात औषधांचा पुरवठा वेळोवेळी करणे संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, गोरेगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीची अवस्था अतिशय वाईट असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता त्याबाबत आरोग्य उपकेंद्राची इमारत वापरात आहे. बांधकाम विभागाने ४ वर्षापूर्वी सदरहू उपकेंद्राची दुरुस्ती केलेली आहे असे कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनी समितीस विशद केले.

समितीने पुढे विचारणा केली की, सदरहू उपकेंद्राला ज्या वेळी भेट दिली त्यावेळी बांधकाम निकृष्ट दर्जाचे, दरवाजांची अवस्था वाईट आणि टाईल्सला भेगा पडल्यामुळे कोणत्याही क्षणी इमारत पडेल अशा अवस्थेत असल्याचे दिसून आल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी माहिती दिली की, गोरेगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची इमारत नादुरुस्त आहे. ती दोन महिन्यांच्या आत दुरुस्त केली जाईल. तसेच आवश्यक ती औषधे लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत आणि साफसफाईकडे कटाक्षाने लक्ष दिले जाणार आहे. पुढील वेळेस समिती जिल्ह्यात आली तर अशी अवस्था दिसणार नाही.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

गोरेगांव प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या नादुरुस्त इमारतीचे काम पूर्ण करण्यात आले आहे काय व सदरहू कामाची सद्य:स्थिती काय आहे. सदरहू उपकेंद्रामध्ये औषधांचा अभाव असुन जी औषधे उपलब्ध होती ती कालबाहय असल्याचे समितीच्या निदर्शनास आले याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत? तसेच या गावांतील अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यात आली आहेत काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

नादुरुस्त इमारतीचे काम पूर्ण करण्यात आलेले नाही. जिल्हा वार्षिक योजनेच्या सन २०१७-१८ चे सर्वसाधारण प्रारुप आराखडयामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र देखभाल दुरुस्ती या शिर्षकांतर्गतचे कामाकरिता एकुण रु.३७१.०० लक्षचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला होता. त्या अंतर्गत उपकेंद्र गोरेगांव येथील किरकोळ दुरुस्ती करिता

रु.२,००,०००/- ची तरतूद प्रस्तावित करण्यात आली होती, परंतु जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०१७-१८ मध्ये प्रस्तावित नियतव्ययापैकी फक्त रु.१,००,००० लक्ष निधी उपलब्ध झाला. प्रस्तावित नियतव्ययापेक्षा पुरेशा प्रमाणात निधी मंजुर न झाल्यामुळे निधी अभावी सदर काम हाती घेता आले नाही.

सदर कामाकरिता पुनश्च जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१८-१९ चे प्रारुप आराखडयामध्ये प्रा.आ.केंद्र/उपकेंद्र देखभाल दुरुस्ती या शिर्षकांतर्गत उपकेंद्र गोरेगांव येथील किरकोळ दुरुस्ती करिता रु. २,००,०००/- ची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. जिल्हा नियोजन समितीकडून निधी मंजुर झाल्यानंतर उपकेंद्र गोरेगांव येथील दुरुस्तीचे काम पुर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सदरहू उपकेंद्रामध्ये औषधांचा अभाव असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. वास्तविकत: प्रा.आ.केंद्रामधुन उपकेंद्राला पुरेशा प्रमाणात औषधसाठा पुरविण्यात आला असतांना सुध्दा संबंधित आरोग्य सेविका विचलित झाल्यामुळे समितीला दाखविले नाही.

जी औषधे उपलब्ध होती ती कालबाहय असल्याचे समितीच्या निदर्शनास आले, वास्तविकत: सदर कालबाहय औषधी प्रा.आ.केंद्राकडुन उपकेंद्राला पुरविण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. परंतु संबंधित आरोग्य सेविका, आरोग्य सेवक व आरोग्य सहायक यांचेवर म.जि.प.जि.से. (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील तरतुदीनुसार खाते चौकशीचा अहवाल प्राप्त होताच संबंधितांवर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सार्वजनिक विभागाचे अभिप्राय:-** शासन सहमत आहे.

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** (योजना-१०) दिनांक २५-५-२०१८ च्या आवास सॉफ्टच्या अहवालानुसार गोरेगांव (बुद्रूक) येथे सन २०१५-१६ ते २०१८-१९ पर्यंत ३९ घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी ५ घरकुले पूर्ण झाली असून ३४ घरकुले प्रगती पथावर आहेत.

गोरेगांव (खुर्द) सन २०१५-१६, ते २०१८-१९ पर्यंत ६७ घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी २६ घरकुले पूर्ण झाली असून ४१ घरकुले प्रगती पथावर आहेत.

इंदिरा आवास योजनेंतर्गत अपूर्ण असलेली घरे पूर्ण करण्याबाबत राज्यस्तरावरून क्षेत्रीय कार्यालयांना सुचना देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात सचिव स्तरावरून सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यासमवेत व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक ३० मे, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने असे निदर्शनास आणून दिले की, पंचायत समिती, अकोला येथील पळसो (बढे) प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरावस्था झाली आहे, ते दुरुस्तीच्या पलीकडे गेले आहे, तेथे डॉक्टर उपस्थित राहत नाहीत, रुग्णांना औषधे मिळत नाहीत. संबंधित वैद्यकीय अधिकारी यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक करीत नसल्यामुळे ही परिस्थिती ओढवत आहे. याबाबत रुग्णांना वेळेत औषध पुरवठा उपलब्ध करुन देण्यात यावा व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहून रुग्णांची नियमित सेवा करावी.

संपूर्ण जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या अखत्यारितील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर उपस्थित असले पाहिजेत, त्यांनी मुख्यालयी राहिले पाहिजे. एखाद्या वेळी प्राथमिक आरोग्य केंद्रांना धावती भेट द्यावी. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट देऊन तेथे औषधांचा पुरवठा व्यवस्थित होतो किंवा नाही तसेच तेथे डॉक्टर उपस्थित राहतात किंवा नाहीत हे पहावे. डॉक्टर न सांगता बाहेरगावी राहत असतील व कामचुकारपणा करीत असल्यास त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करावी.

पंचायत समिती, अकोला येथील पळसो (बढे) प्राथमिक आरोग्य केंद्र व शस्त्रक्रिया विभाग इत्यादीची दुरुस्ती करण्यात यावी. सदर ठिकाणी समिती असते त्यासाठी पैसे मिळत असतात. आपण यामध्ये वैयक्तिकरित्या लक्ष घालून कार्यवाही करावी. अकोला पंचायत समितीच्या पळसो (बढे) प्राथमिक आरोग्य केंद्राचा विषय चर्चेला आला आहे. या विषयात विशेष लक्ष द्यावे. प्रस्ताव व निधी मंजूर झाला आहे. लवकरात लवकर काम पूर्ण करुन घ्यावे.

समितीने पुढे विचारणा केली की, श्वान, सर्प व विंचू दंश झाल्यावर आवश्यक असणाऱ्या लसी फ्रिजरशिवाय ठेवता येत नाहीत. फ्रिजर फक्त प्राथमिक आरोग्य केंद्रांना उपलब्ध आहे. ग्रामीण रुग्णालयात फ्रिजर नाहीत, तेथे असले पाहिजेत, तेथे लोक जाऊ शकतात. १०-१२ कि.मी. चालून प्राथमिक आरोग्य केंद्रात कोणी जाऊ शकत नाही. फार मोठे बजेट नाही. किमान देणगीदाराने दिले तर घेतले पाहिजे, असा निर्णय करावा, उप रुग्णालयातही त्या संदर्भात परवानगी दिली पाहिजे तत्संदर्भात विचार करुन कार्यवाही करावी असे समितीने सूचित केले असता त्यावर ग्रामविकास विभागाकडून पत्र गेले तर बरे होईल असे सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी माहिती दिली.

पंचायत समिती, अकोला येथील पळसो (बढे) या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संदर्भात पैसे मंजूर झाले आहेत. ते काम लवकरात लवकर पूर्ण करावे असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

दिनांक २ जून,२०१७ रोजी पंचायती राज समितीने जिल्हा परिषद अकोला अंतर्गत असलेल्या गोरेगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची पाहणी केली असता औषध साठ्याची पाहणी करीत असताना समितीस असे आढळून आले की, **नवजात बालकाचा जन्म झाल्यानंतर जी अनबायलीकल कोड क्लॅम्प त्याच्या नाळेला लावली जाते, त्या औषधाचा समाप्ती दिनांक उलटून गेलेला असतानाही त्याचा वापर करण्यात आलेला आहे, ही बाब अतिशय गंभीर व चिंताजनक असल्यामुळे याप्रकरणी चौकशी करुन संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

**गोरेगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आढळून आले तसेच त्या ठिकाणी स्वच्छतेचा अभाव दिसून आला. तसेच कालबाह्य झालेली औषधे आढळून आली. त्यामुळे एकंदरीतच सदर उपकेंद्र अत्यंत दुर्लक्षित व दयनिय अवस्थेत सुरु असल्याचे समितीला आढळून आले. त्यामुळे जिल्हा परिषदेनी या उपकेंद्रात आढळून आलेल्या सर्व समस्या व गैरसोयी दूर करुन सुसज्ज व सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्वरीत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

श्वानदंश व सर्पदंशासाठी आवश्यक असणाऱ्या लसी फ्रिजर शिवाय ठेवता येत नाहीत, असे असताना फ्रिजर फक्त प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध आहे अन्य उपकेंद्रांमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे **एखाद्या व्यक्तिस श्वानदंश किंवा सर्पदंश झाल्यास त्याला उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे श्वान दंश लस उपचारासाठी १२ ते १५ किलोमीटर अंतरावर जावे लागते. परिणामी वेळेत औषधोपचार न झाल्याने रुग्णाचा मृत्यू होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. त्यामुळे उपकेंद्रात फ्रिजरची निकड लक्षात घेता ग्रामीण भागासाठी एखाद्या देणगीदाराने फ्रिजर देऊ केल्यास तो स्विकारण्यात येण्याबाबत ग्रामविकास विभागाने निर्णय घेऊन तशी परवानगी प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांना द्यावी अशी समितीची आग्रही शिफारस आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन महिन्यांच्या आत समितीला पाठविण्यात यावा.**

**तसेच समितीने पळसो बढे प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी केली असता सदर आरोग्य केंद्राच्या इमारतीची अवस्था अत्यंत वाईट असून इमारत मोडकळीस आलेली आहे. तसेच सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांसीठी निवासस्थाने देखील अत्यंत निकृष्ट व निकामी झाल्याने संबंधित वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी तेथे राहत नाहीत. परिणामी प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) मधील रुग्णांची संख्या नगण्य असून गोरगरीब रुग्णांना आरोग्य केंद्राकडून योग्य ते औषधोपचार मिळत नसल्यामुळे नाईलाजास्तव खाजगी दवाखान्यांमध्ये उपचार घ्यावे लागतात. यास्तव पळसो बढे येथील सध्याचे प्राथमिक आरोग्य केंद्र व वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गासाठी असलेली निवासस्थाने पाडून नव्याने बांधण्यात यावी.**

**यासंदर्भात विभागीय सचिवांसमवेत समितीने घेतलेल्या साक्षीच्यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत पाडून नव्याने बांधण्याबाबतच्या प्रस्तावावर (Dismantle Proposal) बांधकाम विभागासमवेत पत्रव्यवहार केल्याचे समितीस विदित करण्यात आले आहे. त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण सेवेमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने पळसो बढे येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र व संबंधित वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांकरीता नवीन निवासस्थाने बांधण्यात यावीत अशी समिती शिफारस करीत आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, अकोला (प्रशासन)

## शाळांना पुरवठा करण्यात येणाऱ्या धान्यादी मालाच्या वजनात फरक आढळून येत असल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ जून, २०१७ या कालावधीत अकोला जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे शाळांना पुरवठा करण्यात येणाऱ्या धान्यादी मालाच्या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात कोणताही गैरप्रकार झाल्याचे आढळून आले नाही असे नमूद करण्यात आले, यासंबंधीची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात यावीत असे निदेश समितीने दिले. तद्नंतर समितीने रिधोरा गावाला भेट दिली असता त्याठिकाणी शालेय पोषण आहारात देण्यात येणारी पाकीटे ही ५० किलो वजनाची असतात, परंतु प्रत्यक्षात तांदुळाच्या ४२ अथवा ४७ किलो अशा वजनाच्या गोण्या आढळून आल्या याची तपासणी आपल्या स्तरावर केली की नाही या बाबतचा खुलासा करण्यात यावा अशी समितीने विचारणा केली असता, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खुलासा केला की, शालेय पोषण आहाराचा माल उतरविल्यानंतर त्याचे वजन करुन घेतले जाते व त्याचे जेवढे वजन असेल तेवढीच वजनाची पावती द्यावी अशा सूचना संबंधितांना दिलेल्या आहेत. अशा कमी वजनाच्या गोण्या आल्या तर तशा नोंदी मुख्याध्यापक घेतात अशी माहिती समितीने दिली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, कमी वजनाच्या गोण्या आल्यानंतर तशी नोंदी मुख्याध्यापक घेतात असे जिल्हा परिषदेमार्फत शासनाला कळविलेले नाही, त्यामुळे यासंदर्भात सर्व माहिती एकत्रित करुन शासनाला कळवावी, तसेच या विषयासंबंधी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे निदेश समितीने दिले.

समितीने पुढे विचारणा केली की, गुणवत्ता व मात्रा (क्वाँटीटी व क्वॉलिटी) याबाबत तपासणी केली जाते काय? तांदुळाच्या ४५ किलोच्या गोण्या उतरविल्या जातात आणि मुख्याध्यापक ५० किलोच्या गोण्या उतरविल्या, अशा नोंदी घेतात. ४० किलोच्या आलेल्या गोण्या मुख्याध्यापक ५० किलोच्या म्हणून नोंदी घेत असतील तर ते चुकीचे आहे. त्या मुख्याध्यापकाने ते लिहून घेतले की नाही हे बघण्याची जबाबदारी कोणाची आहे, अशी समितीने संबंधितांना विचारणा केली असता त्यावर आमच्यासह पर्यवेक्षकीय यंत्रणेची जबाबदारी असल्याचे शिक्षणाधिकारी यांनी उत्तर दिले.

सन २०११ मध्ये शासनाने पट पडताळणी केलेली आहे. बोगस विद्यार्थी शोधून काढणे हा त्यामागचा उद्देश आहे. दिनांक ३० सप्टेंबर रोजी पट पडताळणी होणार आहे. पंचायती राज समितीच्या सूचनेनुसार दरवर्षी बोगस विद्यार्थी शोधण्यासाठी पट पडताळणी केली पाहिजे. शाळेतील पट वाढतो किंवा कमी होतो हे तपासण्यासाठी यंत्रणेला सूचना द्याव्यात असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

शाळांना पुरवठा करण्यात येणारा धान्यादी मालाच्या वजनात फरक आढळून येत असल्याने पर्यवेक्षकीय जबाबदारी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली, तसेच तांदुळ इतर गोणीच्या मालात फरक न होण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्याची माहिती द्यावी.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

भारतीय खाद्य निगम यांचेकडून प्रत्येक पोत्यामध्ये प्रमाणित असा ५० किलोग्रॅम तांदुळाचा पुरवठा झाला नव्हता. त्यामुळे शाळा स्तरावरील शिल्लक असलेल्या गोण्यांमध्ये ५० किलोग्रॅम पेक्षा कमी वजनाचा तांदुळ होता. यामध्ये

कोणत्याही पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांचा दोष नसल्यामुळे पर्यवेक्षकीय जबाबदारी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्यात आली नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचा अभिप्राय :-** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र शाळांना भारतीय खाद्य निगम (FCI) याच्यांकडून तांदुळाचा पुरवठा करण्यात येतो.

भारतीय खाद्य निगम यांच्याकडून सदर तांदूळ पंजाब, हरियाणा, मध्यप्रदेश, आदी राज्यामधुन खरेदी करण्यात येतो. सदर तांदळाच्या ५० किलो वजनाच्या गोण्या सिलबंद करण्यात येतात, त्यावेळी तांदुळामध्ये सुमारे १३ टक्के व त्यापेक्षा जास्त ओलावा (Moisture) असतो. भारतीय खाद्य निगम यांच्याकडून गोणी सिलबंद केल्यानंतर शाळा स्तरावर वितरीत होईपर्यत त्याची ५ ते ६ वेगवेगळया टप्प्यावर हाताळणी व वाहतूक करण्यात येते. तसेच सदर तांदूळ आवश्यकतेनुसार भारतीय खाद्य निगम यांच्या साठागृहात साठविण्यात येतो, शाळास्तरावर सदर तांदूळ पुरवठा होईपर्यंत तांदुळामधील ओलाव्याची टक्केवारी २ ते ३ टक्यापर्यंत खाली येते.

धान्यातील १ टक्का ओलावा कमी झाल्याने धान्याचे वजन ०.७ टक्क्याने कमी होते. यानुसार ५० किलो वजनाच्या तांदुळाच्या गोणीमध्ये १ टक्का ओलावा कमी झाल्यास सदर गोणीचे वजन ३५० ग्रॅमने कमी होते. या मुख्यत्वे कारणामुळे तांदुळाच्या गोणीच्या वजनामध्ये तफावत आढळून येते. सदर बाब भारतीय खाद्य निगमने दि. १४/०५/२०१८ च्या पत्रान्वये विभागास अवगत केली आहे.

भारतीय खाद्य महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या तांदुळाच्या सीलबंद गोण्या शाळांना देणे बंधनकारक आहे. वाहतुकदाराने तांदुळाचा पुरवठा शाळांना करतांना सदर गोण्यांचे वजन करुन देणे बंधनकारक आहे. गोणीमधुन प्राप्त झालेल्या तांदुळाचे प्रत्यक्ष वजन केल्यानंतर त्याप्रमाणे प्राप्त मालाची पावती देण्यात यावी अशी स्पष्ट तरतूद वाहतुकदारासोबत करण्यात आलेल्या करारनाम्यात नमूद केली आहे.

तसेच याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या दि. २१/०२/२०१८ च्या स्पष्ट सूचना सर्व शिक्षणाधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १, २ व ३ जून, २०१७ या कालावधीत जिल्हा परिषद, अकोला येथे दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषद शाळेतील धान्याच्या तांदुळाच्या पोत्यात ५० किलो ऐवजी ४२ ते ४७ किलो वजनाचे धान्य असल्याचे आढळून आले होते. शालेय पोषण आहाराचा माल जेव्हा शाळेत उतरविला जातो तेव्हा त्याचे वजन करून तेवढयाच वजनाची पावती देण्याच्या सुचना दिल्या असल्या तरी कमी वजनाच्या गोण्या आल्या तर तशी नोंद मुख्याध्यापकाने घेणे आवश्यक आहे. वाहतुकदाराने तांदुळाचा पुरवठा करतांना सदर गोण्यांचे वजन करणे बंधनकारक आहे. गोणी मधून प्राप्त झालेल्या तांदुळाचे प्रत्यक्ष वजन केल्यानंतर त्याप्रमाणे प्राप्त मालाची पावती देण्यात यावी अशी तरतूद वाहतुकदारासोबत करण्यात आलेल्या करारनाम्यात नमूद केलेली आहे. मात्र करारनाम्यातील कलमांची काटेकोरपणे अमंलबजावणी होत नसल्याचे समितीला आढळून आल्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**शालेय पोषण आहाराचा पुरवठा हा राज्य स्तरावरून निश्चित होतो. अटी व शर्तीनुसार पुरवठादारांकडून बंधपत्र करून घेण्यात येत असले तरी पुरवठादाराने चुकीच्या पध्दतीने पुरवठा केल्यास त्याच्याविरुध्द कारवाई करुन पुरवठादारास काळया यादीत टाकण्यात यावे. विद्यार्थ्यांच्या संख्ये नुसार तांदुळ मागविणे आवश्यक असते मात्र बहुतांश वेळेस जास्त तांदुळ मागविण्यात येतो त्यामुळे यात गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत**

**नाही, त्यामुळे धान्यादी मालाच्या देयकासोबत पुरवठा करण्यात आलेला तांदुळ व धान्यादी माल मागणी प्रमाणे व योग्य वजनाचा प्राप्त झाल्याबाबत सर्व गट शिक्षणाधिकारी/अधीक्षक वर्ग-२ शालेय पोषण आहार पंचायत समिती यांच्या स्वाक्षरीने प्रमाणपत्र सादर करण्यात येत असले तरी त्यामध्ये अनियमितता होत असल्याने पुरवठादाराने संबंधित शाळेत पुरवठा केलेला तांदुळ देयकाप्रमाणे आहे किंवा कसे या करिता नियमित वजन तपासणी करुन जिल्हा परिषदेने भरारी पथक नेमून त्याबाबतची कार्यवाही करावी व शासनाची फसवणूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, अशी समितीची शिफारस असून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

पुरवठादारासमवेत केलेल्या करारनाम्याची अंमलबजावणी संबंधित शाळेने करावयाची आहे, त्यामुळे शाळेच्या मुख्याध्यापकांनी या करारनाम्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होणेबाबत दक्षता घ्यावी. **मुख्याध्यापकांशिवाय गट विकास अधिकारी आणि गट शिक्षणाधिकारी, केंद्र प्रमुख, शालेय शिक्षण समिती व संबंधित शिक्षकांना देखील करारनाम्याच्या लेखी शर्ती व अटी बाबतची माहिती असणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक शाळेमध्ये वजनकाटा आवश्यक आहे. राज्यातील बहुतांश शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजनेमध्ये पुरविण्यात येणाऱ्या धान्याच्या गोणीचे वजन ५० किलोपेक्षा कमी आढळून येते. त्यामुळे संबंधित मुख्याध्यापकांची व पर्यवेक्षकीय यंत्रणेची जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, अकोला (प्रशासन)

## केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १ ते ३ जून, २०१७ या कालावधीत अकोला जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२ - १३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, गावातील ५० ते ६० टक्के ग्रामस्थ उघड्यावर शौचासाठी जात आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या धोरणानुसार ग्राम स्वच्छता अभियान राबविण्याची आवश्यकता आहे. जिल्हा परिषदेला हागणदारी मुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे यास आणखी किती कालावधी लागणार आहे, या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खालील प्रमाणे खुलासा सादर केला.

सन २०१२ मध्ये कोणत्या कुटुंबात शौचालय आहे आणि कोणत्या कुटुंबात शौचालय नाही याबाबत सर्व्हेक्षण केले होते. सद्य:स्थितीत ६८ टक्के कुटुंबियांकडे शौचालये आहेत. अकोला जिल्ह्यात ४२९ ग्रामपंचायती असून त्यापैकी १८३ ग्रामपंचायती हागणदारी मुक्त झालेल्या आहेत. स्वच्छ भारत मिशन योजनेंतर्गत जिल्हा परिषदेने हागणदारी मुक्त करण्यासाठी नियोजन केलेले आहे. त्यासाठी तालुका स्तरावर अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदार यांची नियुक्ती केलेली आहे. तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेत उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र कक्ष तयार केलेला आहे. पातुर तालुका हागणदारी मुक्त करण्यासाठी जिल्हा परिषदेने प्राथम्यक्रमाने हाती घेतलेला आहे. पुढील दोन महिन्याच्या आत पातुर तालुका हागणदारी मुक्त करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले जाणार आहेत असे विशद केले.

समितीने पुढे विचारणा केली की, असाध्य उदिदष्ट १८९१४ मध्ये आणखी सुधारणा करावी लागेल. बहुतेक खेडेगावात अशी तक्रार असते की, त्यांना शौचालय बांधून दिले जात नाही. पळसब सारख्या गावात तसेच काही खेडेगावात पाहिले आहे की, अनेक लोक उघडयावर शौचास जात आहेत. त्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यामध्ये आधाररेषा सर्व्हे झालेला आहे. सन २०१२ च्या सर्व्हेमध्ये ज्यांच्याकडे शौचालय नाही अशा ज्या व्यक्तींची नावे सुटलेली आहेत, अशी काही कुटुंबे गावामध्ये आहेत. या कुटुंबाचा समावेश करण्याकरिता प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांना प्रस्ताव दिलेला आहे. त्यांच्याकडून मान्यता आल्यानंतर या कुटूंबांच्या नावांचाही शौचालय देण्याकरिता यादीमध्ये समावेश करण्यात येईल. सध्या मागेल त्याला शौचालये देत आहोत. या योजनेमध्ये लाभार्थ्यांनी शौचालय त्यांनीच वैयक्तिकरित्या बांधावयाचे आहे. जिल्हा परिषद ते बांधून देत नाही.

समितीने पुढे अशीही विचारणा केली की, अकोला जिल्हयाकरिता २५,००० वैयक्तिक शौचालयांच्या बांधकामांची उदिष्टयपूर्ती ठरविली आहे. जिल्हा परिषदेने केवळ ६,०८६ शौचालयाचे बांधकाम पूर्ण केले आहे. याबाबतची माहिती समितीस अवगत करण्यात यावी, त्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१२-२०१३ या वर्षात उदिष्टपूर्ती झालेली नाही. मागील वर्षी ३२,००० शौचालयांची उदिष्टपूर्ती केली आहे. त्या अगोदर सन २०१५-२०१६ मध्ये २५,००० शौचालयांची उदिष्टयपूर्ती केली आहे. यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांच्याकडे प्रस्ताव पाठविला आहे, परंतु समितीला असे वाटते की, या यादीमधून बरेचसे लाभार्थी सुटलेले असल्याने सुधारित प्रस्ताव लवकरात लवकर पारित करावा तसेच त्याअनुषंगाने विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१२ च्या सर्व्हेक्षणानुसार ज्यांच्याकडे शौचालय नाही अशा कुंटुबांचा शौचालय देण्याबाबतच्या यादीमध्ये समावेश करण्यासंदर्भात शासनस्तरावर प्रस्ताव मंजुर झाला आहे काय, असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबतची स्वंयस्पष्ट माहिती समितीला देण्यात यावी ? सध्या अकोला जिल्हा परिषद हागणदारी मुक्त झाला आहे काय ? नसल्यास, जिल्हयात शौचालयाची एकूण किती मागणी आहे? ती पुर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०१२ च्या पायाभुत सर्व्हेक्षणानुसार ज्यांच्याकडे शौचालय नाही अशा कुंटुंबाना स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना शौचालयाचा लाभ देण्यात आला असुन सन २०१२ च्या पायाभुत सर्व्हेक्षणात समाविष्ट नसलेल्या वाढीव कुटुंबांबाबतची माहिती माहे एप्रिल, २०१६ मध्ये पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांचेकडे सादर केलेली आहे. मा. प्रधान सचिव यांचे पत्र दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ अन्वये स्वच्छ भारत मिशन ग्रामीणच्या पायाभुत सर्व्हेक्षणात समाविष्ट नसलेल्या कुटुंबांना महाराष्ट्र रोजगार हमी योजना अंतर्गत वैयक्तीक शौचालयाचा लाभ देऊन वैयक्तिक शौचालयाचे काम पुर्ण करण्यात यावे असे निर्देश आहेत. त्यानुसार सर्व पंचायत समितींना सुचना दिलेल्या आहेत. सन २०१२ च्या सर्व्हेक्षणानुसार अकोला जिल्हा दिनांक ३ मार्च, २०१८ रोजी हागणदारी मुक्त झालेला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा अभिप्राय :-**

पायाभुत सर्वेक्षणानुसार स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्र राज्य दि.१८ एप्रिल, २०१८ रोजी हागणदारी मुक्त घोषित करण्यात आले आहे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १ ते ३ जून, २०१७ या कालावधीत अकोला जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, गावातील ५० ते ६० टक्के लोक उघडयावर शौचासाठी जातात. केंद्र आणि राज्य शासनाच्या धोरणानुसार ग्राम स्वच्छता अभियान राबविण्याची आवश्यकता आहे. याबाबत जिल्हा परिषदेने हागणदारी मुक्त करण्यासाठी कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे दिसून येते. सन २०१२ मध्ये कोणत्या कुटुंबात शौचालय आहे आणि कोणत्या कुटुंबात शौचालय नाही याबाबत आधाररेषा सर्व्हेक्षण केला होता. **सद्य:स्थितीत ३२ टक्के कुटुंबियांकडे शौचालये नाहीत. अकोला जिल्ह्यात ४२९ ग्रामपंचायतीपैकी फक्त १८३ ग्रामपंचायती हागणदारी मुक्त झालेल्या असून अद्याप २४६ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झालेल्या नाहीत. त्याअर्थी ५७.५४ टक्के ग्रामपंचायती अद्याप हागणदारीमुक्त झालेल्या नाहीत त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

स्वच्छ भारत अभियान योजनेंतर्गत जिल्हा परिषदेने १८९१४ शौचालय बांधण्याचे उद्दिष्ट होते. तथापि, यामध्ये आणखी सुधारणा करावी लागेल. बहुतेक खेडे गावांमध्ये शौचालय बांधून दिली जात नाहीत अशा स्वरुपाची तक्रार असते. अनेक गावांमध्ये लोक उघड्यावर शौचास बसतात ही अत्यंत खेदाची बाब आहे. त्यामुळे **सन २०१२ च्या सर्व्हेक्षणामध्ये ज्यांच्याकडे शौचालये नाहीत अशा आतापर्यंतच्या सर्व व्यक्तींची नावे समाविष्ट करण्यात आलेली नाहीत अशा कुटुंबाचा समावेश शौचालये देण्याकरिताच्या यादीमध्ये करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

# परिशिष्ट (अ)
# शासनाचे आदेश व परिपत्रके

(परिशिष्ट क्र. ३.१)

GR - 20040730124003001 - 1201

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ४ अन्वये ग्राम पंचायतीचे विभाजन / एकत्रीकरण किंवा त्रिशंकू भागासाठी स्वतंत्र ग्रामपंचायतीची स्थापना सर्व समावेशक सूचना

(परिशिष्ट क्र. ३.१)

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६०३/प्र.क्र. १५४४/पंरा-४ (२५)
मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक 12 फेब्रुवारी २००४

वाचा : - शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम ११८९ कं.नं. ३०१०/२२ दिनांक ५.२.९०

शासन निर्णय :-

ग्राम पचायतीचे विभाजन करुन स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे अथवा एकत्रिकरण अथवा त्रिशंकू भागाच्या ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन करण्याच्या कार्यपध्दतीबाबत शासनाने दि. ५.२.९० च्या परिपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत. तथापि, सदर परिपत्रकान्वये निश्चित केलेले निकष हे तेरा वर्षापूर्वीचे असल्याने, सध्याच्या परिस्थितीत सदर निकषामध्ये बदल करणे आवश्यक आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. तसेच ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय, आर्थिक व वैधानिक बाबींच्या संदर्भात शासनाने १९९६ मध्ये नेमलेल्या गगराणी समितीने ग्रामपंचायत स्थापनेबाबतच्या निकषात बदल करण्याबाबत शिफारस केली होती. यास्तव गगराणी समितीने केलेल्या शिफारशींच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतच्या निकष व अटींमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. आता याप्रकरणी शासनाने स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याकरिता खालील निकष व अटी निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) महसुली गाव :- ग्रामपंचायतीचे विभाजन /एकत्रिकरण /त्रिशंकू भागासाठी स्वतंत्र ग्राम पंचायत स्थापन करताना, शासन स्तरावर केवळ 'महसूली गाव' या घटकाचा विचार करण्यात येतो ज्याठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची आहे, ते क्षेत्र महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४ (१) नुसार

स्वतंत्र महसूली गाव म्हणून जाहीर झालेले असले पाहिजे . महसूल विभागाने स्वतंत्र महसूली गाव म्हणून जाहिर न केलेल्या क्षेत्रासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करता येणार नाही.

ब) **लोकसंख्या** :- ज्या महसूली गावी , स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची असेल ,त्या गावांची लोकसंख्या कमीत कमी दोन हजार असणे आवश्यक आहे. केवळ अपवादात्मक प्रकरणात (उदा. आदिवासी व तांडा या भागांसाठी किंवा दोन गावांत जर तीन कि.मी. पेक्षा जास्त अंतर असेल )तर त्या भागाकरीता किमान लोकसंख्या एक हजार असणे आवश्यक आहे. पाटबंधारे प्रकल्पामुळे प्रकल्प विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी जी नवीन गावठाण बसविता येतात.अशा ठिकाणी , स्वतंत्र ग्राम पंचायत स्थापन करण्याकरिता प्रस्तावित ग्राम पंचायतीचे किमान लोकसंख्या एक हजार असणे आवश्यक आहे.

क) **आर्थिक परिस्थिती** :- नव्याने स्थापन करण्यात येणारी ग्रामपंचायत आर्थिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. म्हणजेच तिचे दरडोई वार्षिक कररुपी उत्पन्न किमान रु. ३०/- असणे आवश्यक आहे. डोंगराळ व आदिवासी भागासाठी दरडोई कररुपी वार्षिक उत्पन्न किमान रु. २५/- असणे आवश्यक आहे. पाटबंधारे प्रकल्पामुळे प्रकल्प विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी जी नवीन गावठाणे बसविण्यात येतात, अशा ठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याकरीता प्रस्तावित ग्राम पंचायतीचे दरडोई कररुपी वार्षिक उत्पन्न रु.२०/- असणे आवश्यक आहे.

ड) **स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याची मागणी** :- विभागीय आयुक्त किंवा जिल्हा परिषद यांनी स्वतःहून स्वतंत्र ग्रामपंचायतीचे प्रस्ताव करु नयेत . गावातील रहिवाशी किंवा ग्रामपंचायत यांनी तशी मागणी केली तरच त्यावर विचार करावा स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे प्रस्ताव कोणत्याही स्तरावर क्षेत्रिय अधिका-यांनी प्रलंबित ठेवू नयेत . सदर प्रस्तावावर त्वरीत कार्यवाही करुन अंतिम निर्णयासाठी शासनाकडे सादर करावे. प्रस्ताव निकषात बसत नसल्यास , त्याप्रकरणी त्वरीत निर्णय घेऊन क्षेत्रिय अधिका-यांनी संबधितांना त्याबाबत कळविणे आवश्यक आहे. यास्तव, संबंधित क्षेत्रिय अधिका-यांनी , याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन ग्राम पंचायत विभाजनाचे प्रस्ताव कोणत्याही स्तरावर प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

इ) **स्थायी समिती आणि संबंधित ग्राम पंचायतीशी विचार विनिमय** :- बहुतांश प्रस्ताव कारण नसताना ग्राम पंचायत स्तरावर तसेच जिल्हा परिषद स्तरावर (स्थायी समिती ) संबंधित ग्रामपंचायत तसेच संबंधित जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या ठराव संमत करण्याच्या कारणास्तव प्रलंबित असतात. ग्रामस्थांनी मागणी केल्यावर

ग्रामपंचायतीने स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याच्या प्रस्तावावर तारित ठराव करणे आवश्यक आहे. तसेच असे प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीकडे प्राप्त झाल्यावर स्थायी समितीने याबाबत त्वरित ठराव करणे आवश्यक आहे. एखादया ग्रामपंचायतीच्या ठिकाणी ग्रामपंचायत अस्तित्वात नसल्यास त्यावेळी त्या ग्रामपंचायतीच्या प्रशासकाने केलेला ठराव ग्राहय धरण्यात येईल. तसेच एखादया जिल्हा परिषदेच्या ठिकाणी स्थायी समिती अस्तित्वात नसल्यास,त्यावेळी प्रशासकाने केलेला ठराव ग्राहय धरण्यात येईल.

इ) <u>**ग्रामस्थांची मागणी :-**</u> ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतर ग्रामपंचायतींनी ठराव करण्यापूर्वी खालील सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

(१) ग्राम पंचायतीचे विभाजन / एकत्रीकरण करीत असताना त्याबाबत संबधित गावामधील गावक-यांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेशी संधी देण्यात आली पाहिजे.

(२) ज्या ग्रामपंचायतीचे विभाजन /एकत्रिकरण करावयचे आहे , त्या ग्रामपचायतीमधील सर्व गावांच्या चावडीवर , ग्रामपंचायतीमध्ये अथवा संबंधित प्रभागामधील प्रमुख ठिकाणी तशी लेखी सूचना लावण्या आली पाहिजे.

(३) त्याचबरोबर प्रस्तावित ग्राम पंचायत विभाजन / एकत्रिकरण याबाबतची जाहिर सूचना उपरोक्त ठिकाणी ढोल वाजवून वा अन्यप्रकारे देण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीने ग्रामस्थांच्या प्राप्त झालेल्या हरकती व सूचना लक्षात घेऊन, सुस्पष्ट ठराव करणे आवश्यक आहे.

च) <u>**दोन वर्षाचा कालावधी**</u> ग्रामपंचायतीची निवडणूक होऊन , ग्रामपंचायत अस्तित्वात आल्यापासून दोन वर्षाच्या कालावधीपर्यंत ग्रामपंचायतीचे विभाजन / एकत्रिकरण करु नये.

छ) <u>**त्रिशंकू गावे**</u> - राज्यातील काही गावांचा किंवा भागांचा समावेश नगर परिषद किंवा ग्रामपंचायतीच्या हद्दीत नसून त्यामुळे तेथील जनतेला नगर परिषद

किंवा ग्रामपंचायत निवडणूकामध्ये भाग घेता येत नाही. आणि स्थानिक नागरी सुविधांपासून वंचित रहावे लागते. म्हणून अशी गावे किंवा भाग त्रिशंकु अवस्थेत न ठेवता नजीकच्या नगरपरिषद /ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट करण्याचे प्रस्ताव विभागीय आयुक्त यांनी शासनास त्वरित सादर करावे. किंवा त्याठिकाणी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे प्रस्ताव शासनास त्वरित सादर करावे. असे प्रस्ताव कोणत्याही स्तरावर प्रलंबित ठेवण्यात येऊ नये. याबाबत विभागीय आयुक्तांनी वेळोवेळी आढावा घेऊन , आपल्या विभागामध्ये त्रिशंकु क्षेत्र राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

ज) मुख्य ठिकाण - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम (४) अन्वये जे महसूली गाव स्वतंत्र गाव म्हणून जाहिर झालेले असेल , तेच गाव त्या ठिकाणचे मुख्य ठिकाण म्हणून दर्शविले जाईल.

झ) <u>ग्राम पंचायत विभाजनाचे प्रस्ताव</u> :- ग्रामपंचायत विभाजनाचे प्रस्ताव शासनास सादर करताना ग्रामपंचायतीचा ठराव व स्थायी समिती जिल्हा परिषदेचा ठरावासह मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद यांची स्पष्ट शिफारस व विभागीय आयुक्तांची स्पष्ट शिफारस समाविष्ट करुनच प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी शासनास विहीत प्रपत्रात व सर्व कागदपत्रांसह सादर करावे. ग्राम पंचायत निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाल्यावर तसेच आचारसंहिता लागू असल्यास ग्राम पंचायतीचे विभाजन / स्वतंत्र ग्राम पंचायत स्थापन करता येत नाही. ही बाब ध्यानात घेऊन , प्रस्ताव शासनाकडे आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच सादर करण्याची दक्षता घ्यावी. ग्राम पंचायत निवडणूकीची प्रक्रिया सुरु झाल्यावर, विभागीय आयुक्तांनी विभाजनाचे प्रस्ताव शासनाकडे सादर करु नयेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कुंदा गोसावी )
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त (सर्व )
२) जिल्हाधिकारी (सर्व )
३) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ( सर्व )
४) निवड नस्ती - का.क्र. पंरा-४ (२२)

## परिशिष्ट (ब)
## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

## गुरुवार, दिनांक १ जून, २०१७
## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अकोला

**उपस्थिती :**

(१) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख
(२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
(३) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
(५) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.
(६) श्री. अमित झनक, वि.स.स.
(७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(८) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**स्थानिक लोकप्रतिनिधी :**

श्री.हरिष पिंपळे, वि.स.स.

**स्थानिक पदाधिकारी :**

(१) श्रीमती संध्या वाघोडे, अध्यक्षा, जिल्हा परिषद, अकोला
(२) श्री.जमीरखाँ अमानउल्लाखॉ, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, अकोला
(३) श्रीमती भावना राजूपाटील सरदार, सभापती, पंचायत समिती, मुर्तिजापूर
(४) श्रीमती आशा इंगळे, सभापती, पंचायत समिती, तेल्हारा
(५) श्रीमती रेखाताई अंभोरे, सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, अकोला
(६) श्री. पुंडलिक अरबट, सभापती, शिक्षण व अर्थ समिती, जिल्हा परिषद, अकोला
(७) श्रीमती माधुरी गावंडे, सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती, जिल्हा परिषद, अकोला

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री. ना.भा.रिंगणे, उप सचिव
(२) श्रीमती सरोज देशपांडे, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद, अकोला**

(१) डॉ. सुभाष पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) सौ. संगिता नागर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(३) श्री. विलास खिल्लारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(४) श्री. श्रीराम कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(५) श्री. समर्थ शेवाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)
(६) श्री. प्रकाश मुकुंद, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(७) श्री. प्रशांत दिग्रसकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(८) श्रीमती वैशाली ठग, शिक्षणाधिकारी (निरंतर)
(९) श्री. अरविंद देशमुख, कार्यकारी अभियंता (सिंचन)
(१०) श्री. विजय वाट, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
(११) श्री. एस.पी.सोनकुसरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)
(१२) डॉ. हरी पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
(१३) डॉ. विजय जाधव, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी
(१४) श्री. किशोर ढवळे, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)
(१५) श्री. एच.जी.ममदे, कृषीविकास/समाजकल्याण अधिकारी
(१६) श्री. गजानन वेल्हे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला
(१७) श्री. कालीदास तापी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोट
(१८) श्री. राजीव फडके, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तेल्हारा
(१९) श्री. संदीप भंडारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शिटाकळी
(२०) श्री. शेखर शेलार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पातूर
(२१) श्री. वाय.डी.शिंदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर
(२२) श्री. जी.पी.अगर्ते, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुर्तिजापूर

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अकोला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकार व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील अकोला जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

## शुक्रवार, दिनांक २ जून, २०१७
## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अकोला

**उपस्थिती :**

(१) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख
(२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
(३) श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
(४) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
(६) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
(७) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.
(८) श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
(९) श्री. अमित झनक, वि.स.स.
(१०) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री.ना.भा.रिंगणे, उप सचिव
(२) श्रीमती सरोज देशपांडे, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद, अकोला**

(१) डॉ. सुभाष पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) सौ. संगिता नागर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(३) श्री. विलास खिल्लारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(४) श्री. श्रीराम कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(५) श्री. समर्थ शेवाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)
(६) श्री. प्रकाश मुकुंद, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(७) श्री. प्रशांत दिग्रसकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(८) श्रीमती वैशाली ठग, शिक्षणाधिकारी (निरंतर)
(९) श्री. अरविंद देशमुख, कार्यकारी अभियंता (सिंचन)
(१०) श्री. विजय वाट, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
(११) श्री. एस.पी.सोनकुसरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)
(१२) डॉ. हरी पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
(१३) डॉ. विजय जाधव, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी

(१४) श्री. किशोर ढवळे, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)
(१५) श्री. एच.जी.ममदे, कृषीविकास/समाजकल्याण अधिकारी
(१६) डॉ. मेहरे, पशुधन विकास अधिकारी
(१७) श्री. गजानन वेल्हे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला
(१८) श्री. कालीदास तापी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोट
(१९) श्री. राजीव फडके, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तेल्हारा
(२०) श्री. संदीप भंडारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शिटाकळी
(२१) श्री. शेखर शेलार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पातूर
(२२) श्री. वाय.डी.शिंदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर
(२३) श्री. जी.पी.अगर्ते, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुर्तिजापूर

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अकोला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात अकोला जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शनिवार, दिनांक ३ जून, २०१७**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अकोला**

**उपस्थिती :**

(१) श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख
(२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
(३) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
(५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
(६) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.
(७) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
(८) श्री. अमित झनक, वि.स.स.
(९) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग**

(१) श्री. ना.भा.रिंगणे, उप सचिव
(२) श्रीमती सरोज देशपांडे, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद, अकोला**

(१) डॉ.सुभाष पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) सौ.संगिता नागर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(३) श्री.विलास खिल्लारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(४) श्री.श्रीराम कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(५) श्री.समर्थ शेवाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)
(६) श्री.प्रकाश मुकुंद, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(७) श्री.प्रशांत दिग्रसकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(८) श्रीमती वैशाली ठग, शिक्षणाधिकारी (निरंतर)
(९) श्री.अरविंद देशमुख, कार्यकारी अभियंता (सिंचन)
(१०) श्री.विजय वाट, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
(११) श्री.एस.पी.सोनकुसरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)
(१२) डॉ.हरी पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
(१३) डॉ.विजय जाधव, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी
(१४) श्री.किशोर ढवळे, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१५) श्री. एच.जी.ममदे, कृषीविकास/समाजकल्याण अधिकारी
(१६) डॉ. मेहरे, पशुधन विकास अधिकारी
(१७) श्री. गजानन वेल्हे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला
(१८) श्री. कालीदास तापी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोट
(१९) श्री. राजीव फडके, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तेल्हारा
(२०) श्री. संदीप भंडारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शिटाकळी
(२१) श्री. शेखर शेलार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पातूर
(२२) श्री. वाय.डी.शिंदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर
(२३) श्री. जी.पी.अगर्ते, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुर्तिजापूर

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अकोला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील अकोला जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २९ मे, २०१८**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(३) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(५) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(६) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय**

श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा

**मंत्रालयीन विभागीय सचिव**

(१) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(२) श्री. एकनाथ डवले, सचिव (अतिरिक्त कार्यभार), ग्रामविकास विभाग
(३) श्री. एकनाथ डवले, सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग
(४) श्रीमती विनिता वेद सिंघल, सचिव, महिला व बालविकास विभाग
(५) श्री. किरण कुरुंदकर, सचिव, पशुसंवर्धन विभाग
(६) श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग
(७) श्री. संतोष कुमार, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ
(८) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, अकोला**

(१) श्री. कैलास पगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. विलास खिल्लारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(३) श्री. के.आर.तापी, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
(४) श्री. ज.श्री. मानमोठे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(५) श्री. श्रीराम कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(६) डॉ. एम.एम.राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी
(७) श्री. एच.जी.ममदे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव (अतिरिक्त कार्यभार), ग्रामविकास विभाग, सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, पशुसंवर्धन विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ३० मे, २०१८**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री.बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(६) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(८) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय**
श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा
सौ.सु.प.अहिरराव, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा

**मंत्रालयीन विभागीय सचिव**

(१) श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
(२) श्री. एकनाथ डवले, सचिव (अतिरिक्त कार्यभार), ग्रामविकास विभाग
(३) श्री. एकनाथ डवले, सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग
(४) श्री. पी.वेलरासु, सचिव (अतिरिक्त कार्यभार), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
(५) श्री. दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(६) श्री. र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग
(७) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(८) श्री. ना.भा.रिंगणे, उप सचिव (वित्त), ग्रामविकास विभाग
(९) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(१०) श्री. संतोष गायकवाड, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग
(११) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, अकोला**

(१) श्री. कैलास पगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. विलास खिल्लारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(३) श्री. के.आर.तापी, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
(४) श्री. ज.श्री. मानमोठे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(५) श्री. यु.एस.मानकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)
(६) श्री. कि.अ.ढवळे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
(७) श्री. हारुन आतार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(८) डॉ. गणपत मोरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(९) श्री. श्रीराम कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
(१०) डॉ. एम.एम.राणे, जिल्हा आरोग्य अधिकारी
(११) श्री. एच.जी.ममदे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव (अतिरिक्त कार्यभार), ग्रामविकास विभाग, सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग, सचिव (अतिरिक्त कार्यभार), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :-**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(६) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत एकोणीसाव्या व एकविसाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मद्रणालय, मुंबई